म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक विठ्ठल कृष्णाजी [illegible]

खेडकर

हालय क्रमांक

पुस्तकाचें नांव धर्म [illegible] आधुनिक [illegible] तत्त्वे

१८[illegible]

११

धर्मशिक्षा

धर्म

# प्रस्त शिक्षा

अथवा

# ब्राह्मधर्माचीं मूलतत्त्वें

हें पुस्तक,

मूळ बंगालीवरून

## विठ्ठल कृष्णाजी खेडकर

यांनीं तयार केलें.

तें,

## रा० रा० रामचंद्र आसेन्ना घानले

यांनीं

मुंबईमध्यें

'निर्णयसागर' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

शके १७९५.—सन १८७३.

किंमत ९ आणे.

प्रस्तावना.

ा मृत्युलोकीं मी कोठून आलों, एथील माझीं कर्त-
कोणतीं, पुढें जाणार कोठें, तेथें माझी व्यवस्था का-
ाणार व त्या ठिकाणीं जाण्याकरितां आपल्याबरोबर
ती सामग्री तयार करून घेतली पाहिजे यां-
यीं विचार कारणें हें प्रत्येक मनुष्याचें मुख्य कर्त्तव्य
. हा विचार करण्याचें काम जरी नवीन सा-
ण विचारी शोधकांच्या शक्तीबाहेर आहे; तरी ज्यांनीं
गहन विषयांचा अनेक प्रकारें शोध केला आहे त्यां-
ासून, किंवा त्या विषयांवर लिहिलेल्या सूक्ष्मविचारी
धकारांच्या ग्रंथांवरून तें त्यांस समजून घेणें बरेंच
लभ पडतें. मग ते शोधक किंवा ते ग्रंथ कोणत्या
ां धर्ममताचे असतना; तरी त्यांनीं प्रदर्शित केलेल्या
ाचारांची माहिती करून घेऊन त्यांचें निःपक्षपातपणें
थन करून वास्तविक तत्त्वरूपी सत्य ग्रहण करणें हा
त्येकाचा धर्म होय.

या सत्याचा कित्येक धर्मवेत्त्या विचारशील निःपक्षपाती विद्वानांनीं शोध लावून त्याचा प्रसार करण्याचा क्रम सुरू केला आहे. त्या सत्यालाच **ब्राह्मधर्म** ह्मणतात. हा धर्म नवीन आहे असें समजूं नये. तो सनातन असून सर्व जगाचा एकच धर्म आहे. याचा प्रसार बंगाल देशांत बराच होत चालल्यामुळें तेथील भाषेंत त्या विषयावर अनेक ग्रंथ प्रसिद्ध झाले अहेत; परंतु या आपल्या महाराष्ट्र भाषेंत तसले ग्रंथ फारसे दिसत नाहींत; किंबहुना ज्यांत सर्व **ब्राह्मधर्म** संक्षेप रीतीनें प्रतिपादन केला आहे असें एकहि पुस्तक आजपावेतों प्रसिद्ध झालें नाहीं असें ह्मटलें असतां चालेल. याकरितां सांप्रत असल्या मुख्य उपयुक्त पुस्तकांची फारच आवश्यकता दिसल्यावरून कलकत्ता एथील **ब्राह्मसमाजाकडून** त्याच धर्मावर जीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत त्यांपैकीं **"धर्मशिक्षा"** या नांवाच्या ल्हानशा पुस्तकाचें हें महाराष्ट्र भाषांतर करून धर्मशोधकांच्या पुढें ठेविलें आहे. याचा उपयोग आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस होईल अशी पूर्ण आशा आहे.

या पुस्तकाचें भाषांतर तपासून पाहंण्याकारितां रा० रा० भिकोबा लक्ष्मण यांनीं बरेच परिश्रम घेतले ह्मणून

त्या विचारशील धर्मतत्त्ववेत्त्या गृहस्थांचा, व भाषांतराची हस्तलिखित प्रत वाचून पाहण्याकरितां ज्या कित्येकांनीं आपला अमूल्य वेळ खर्च केला त्या विद्वान् गृहस्थांचाहि मी फार आभारी आहें.

या पुस्तकाच्या शेवटीं ज्या प्रार्थना छापिल्या आहेत त्या मूळ बंगाली पुस्तकांत नाहींत. **ब्राह्मसमाजानें** बंगाली भाषेंत "**सामाजिक ब्रह्मोपासनाप्रणाली अथवा प्रार्थनामाला**" या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे त्यांतून कित्येक प्रार्थनांचें भाषांतर करून घेतल्या आहेत, व रा० भिकोबा यांनीं केलेल्याहि कांहीं प्रार्थना घातल्या आहेत.

वि० कृ० खेडकर.

मुंबई, ता० १३ सप्तंबर १८७३. भाद्रपद वद्य ७.

# अनुक्रमणिका.


| | पृष्ठ. |
|---|---|
| ईश्वराचें अस्तित्व व त्याचें स्वरूप. | १ |
| आत्मा. | १३ |
| मनुष्यमात्राची एक जाति. | २५ |
| धर्म. | २७ |
| संसार. | ३३ |
| परकाल. | ३७ |
| प्रायश्चित्त. | ४३ |
| मुक्ति. | ४४ |
| सुखदुःख. | ४५ |
| आत्मोन्नति. | ४६ |
| प्रार्थना. | ४७ |
| ईश्वरदर्शन. | ४९ |
| उपासना. | ,, |
| उपदेश. | ५० |
| ब्रह्मोपासना. | ५४ |

धर्म ३८

# धर्मशिक्षा

अथवा

# ब्राह्मधर्माचीं मूलतत्त्वें.

## ईश्वराचें अस्तित्व व त्याचें स्वरूप.

या सर्व ब्रह्मांडाचा उत्पन्नकर्त्ता व नियंता कोणीतरी **महापुरुष** असावा एवढेंच सिद्ध करण्याकरितां महान् महान् विचारशील पंडितांनीं आपला बराच काळ खर्च करून मोठमोठे ग्रंथ रचिले आहेत. शेवटीं त्यांनीं असें ठरविलें कीं या विषयावर जितकें विस्तारें लिहावें तितकें थोडेंच. असा बारीक विचार करून शोध लावण्याची कांहींच आवश्यकता दिसत नाहीं. त्या महापुरुषाच्या **अस्तित्वाचें ज्ञान** मनुष्यांस स्वाभाविकच होतें. ज्यांचें मन विकृत झालें आहे तेच मात्र भ्रांतचित्त होत्साते ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं मनांत संशय ठेवून आपल्या आत्म्यांस दोषी करण्याकरितां प्रवृत्त

होतात. जे कोणी हें अगाध विश्वरचनेचें कौशल्य पाहून आनंदसागरांत निमग्न होऊन व त्या विश्वकर्त्यावर अंतःकरणपूर्वक प्रीति जडवून परितृप्त होतात त्यांची ती प्रीतिपूर्ण मुखश्रीच अवलोकन केली तर, पाषाणहृदय मनुष्याच्याहि मनांत त्याच्या अस्तित्वाविषयीं संदेह राहणार नाहीं. या सृष्टीचें अस्तित्व हेंच त्याच्या अस्तित्वास सबळ प्रमाण आहे. कोणतीहि वस्तु सूक्ष्मरीतीनें अवलोकन केली असतां तिच्या रचनेमध्यें कांहींतरी चमत्कारिक कुशलता दृष्टिगोचर होते. या सर्व सृष्टीचे व तसेच आकाशांतील सूर्य, चंद्र इत्यादि ग्रह व उपग्रह यांचे व्यापार चमत्कारिक नियमांनीं चालत असून कोणताहि पदार्थ अथवा नियम निरर्थक आहे असे नाहीं. यावरून स्पष्टपणें सिद्ध करितां येतें कीं, या सर्व ब्रह्मांडाचा स्रष्टा व नियंता कोणीतरी **महान् पुरुष** असावा यांत संशय नाहीं. त्याच्या इच्छेवांचून कोणतीहि गोष्ट घडून येत नाहीं. सर्व व्यापारांच्या कार्यास तोच मूलभूत कारण आहे.

"ईश्वर आहे" एवढेंच मानल्यानें त्याची पूर्णता होत नाहीं ; त्याचें स्वरूप कसें काय आहे याविषयीं

माहिती करून घेणें हेंहि आवश्यक होय. जसें मनुष्याची आकृति व त्याचे ज्ञानधर्म यांची पूर्णपणें माहिती करून न घेतां केवळ मनुष्याचीच भावना केली, तर जसें त्याचें स्वरूपलक्षण बरोबर समजत नाहीं तसेंच ईश्वराच्या स्वरूपाची ओळख करून न घेतां केवळ "ईश्वर" या शब्दानेंच अर्थ स्पष्ट होत नाहीं. यास्तव तो कसा काय आहे याविषयीं माहिती करून घेणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य कर्म होय.

तो ज्ञानी व मंगलगुणी असल्यामुळें त्यास **ज्ञानस्वरूप** व **मंगलस्वरूप** ह्या संज्ञा देतात. त्याच्या स्वरूपाचीं हीं सदरील दोन लक्षणें प्रधान होत. या दोन लक्षणांशिवाय त्याचें अस्तित्व ग्रहण करणें निरर्थक समजावें. "**तो आहे**" ह्मणजे त्याजबरोबर त्याचें ज्ञानस्वरूप व मंगलभाव हीं धरण्यांत आलीं पाहिजेत. कारण प्रत्येक कार्यकारणांत त्याचें ज्ञानस्वरूप व मंगलभाव हीं स्पष्टपणें दिसतात, हें साधारण विचार केल्यानें समजतें. सारांश, सर्व प्रकारच्या कृत्यांमध्यें त्याचें ज्ञान दिसून सर्व पदार्थांच्या घटनेंत त्याच्या मंगलभावाचा ठसा उठला आहे. मनुष्य, पशु, पक्षी, कीटक व पतंग इत्यादि

प्राणी, त्याच्या ज्ञानी व मंगल अभिप्रायाविषयीं साक्ष देतात. सर्व ब्रह्मांडाचा कारणीभूत जर तोच आहे तर तो ज्ञानी नसावा असें कधींहि होणार नाहीं. तो ज्ञानवान् असून मंगलस्वरूपी नाहीं हेंहि ह्मणणें त्याप्रमाणेंच असंभव्य होय. ही सृष्टि ज्यानें रचिली तो जर अमंगल आहे तर तो ईश्वरच नाहीं. त्यास जर ज्ञान नाहीं तर तो जडवस्तु असावा; जर तो सद्गुणी नाहीं तर तो निष्ठुर असुर किंवा राक्षस असावा. परंतु तसें नाहीं, सर्व ब्रह्मांडांतील पदार्थमात्र त्याच्या ज्ञानाचें व मंगलस्वरूपाचें प्रकटीकरण करिताहेत. असा कोणताहि नियम नाहीं कीं, ज्यांत त्याचा मंगल अभिप्राय प्रकाशित होत नाहीं, व असें कोणतेंहि कार्य नाहीं कीं, ज्यांत त्याचें अपार ज्ञान स्पष्ट दिसत नाहीं. ईश्वराच्या स्वरूपवर्णनांतून हे दोन गुण जर गाळून टाकिले तर त्यांत त्याचा तिळमात्र भाव राहणार नाहीं. ह्मणून त्याच्या अस्तित्वाबरोबर त्याचें ज्ञानस्वरूप व मंगलस्वरूप हीं दोन मुख्य लक्षणें स्पष्टपणें उपस्थित असलीं पाहिजेत.

**तो अनंत**——ईश्वर जर ज्ञानस्वरूप व मंगलस्वरूप

आहे तर त्याचें ज्ञान व मंगलभाव हीं परिमित किंवा अपरिमित आहेत हें समजून घेणें आवश्यक होय. तसेंच तो कित्येकांस जाणतो व कित्येकांस जाणत नाहीं; त्याची दृष्टि कित्येक देशांवर जाते व कित्येकांवर पोहोंचत नाहीं; तो बाहेर आहे व अंतरीं नाहीं इत्यादिकांची माहिती करून घेणें हेंहि फार अगत्याचें आहे.

ईश्वरास सीमा आहे,—परिमाण आहे—अथवा त्यांत कांहींतरी कमीपणा आहे अशी कल्पना केल्यानें त्यास कधींहि ईश्वर ह्मणतां येणार नाहीं. कारण दुसऱ्या कोणत्याहि सृष्टपदार्थाचा निर्देश करितां येतो; परंतु त्याचा करवत नाहीं. तो सर्वांठायीं परिपूर्ण असून त्याचें तोच पूर्ण स्वरूप जाणतो. आह्मी अपूर्ण ज्ञानी असल्यामुळें त्याचें पूर्णस्वरूप जाणून घेणें हें आह्मास केवळ अशक्य आहे. याजकरितां त्यास **अनंत**, **असीम**, **अपरिमेय** इत्यादि विशेषणें दिल्यावांचून राहवत नाहीं. त्याच्या कोणत्याहि गोष्टीविषयीं थांग लागत नाहीं, ह्मणून तो **अनंत** आहे. तो ज्ञान—शक्ति—मंगलभाव व देशकाल ह्यांच्या संबंधानेंहि **अनंत** आहे.

**तो सर्वज्ञ**—त्याचें ज्ञान त्याच्या अनंत गुणांस

मिळविलें ह्मणजे त्यास **सर्वज्ञ** ह्मणतात. तो भूत, भविष्य व वर्त्तमान या तीनही काळांचे सर्व व्यापार जाणतो. तो बाहेरील सर्व विषय जाणतो इतकेंच नाहीं, तर आमच्या मनांतील सर्व कामना व भावहि समजतो. अंधकार कोणत्याहि प्रकारचें कुकर्म त्याजपासून गोपन करूं शकत नाहीं व त्याप्रमाणेंच कपटता सत्यास लपवूं शकत नाहीं. सारांश, तो सर्वसाक्षिरूपें सर्वत्र पाहत आहे. त्याच्या ज्ञानास सीमा नाहीं ह्मणून तो **सर्वज्ञ**.

**तो पूर्णमंगल**—जेव्हां त्याचें मंगलस्वरूप व अनंतगुण एकत्र करितात तेव्हां त्यास **पूर्णमंगल** ह्मणतात. वाइटाशीं त्याचा लेशमात्र संबंध नाहीं. कोणताहि दोष किंवा कलंक त्यास स्पर्श करूं शकत नाहीं. सारांश, त्याच्या मंगलगुणास पार नाहीं ह्मणून तो **पूर्णमंगल** समजावा.

**तो सर्वशक्तिमान्**— जेव्हां त्याच्या शक्तीविषयीं वर्णन करूं लागतों तेव्हां तो **अनंतशक्ति** किंवा **सर्वशक्तिमान्** आहे असें प्रत्ययास येतें. एकादें चांगलें काम शेवटास न्यावें अशी इच्छा धरून जर आमच्या

अंगीं शक्तीचा अभाव आहे तर तो मनोरथ पूर्ण होत नाहीं; कारण आमची शक्ति अपूर्ण आहे. परंतु ईश्वराविषयीं तशी गोष्ट नाहीं; त्याची इच्छा मंगलमय असून शक्ति अपार आहे ह्मणून तो जें इच्छितो तें तडीस जातें. त्याच्या त्या अपारशक्तीच्या योगानें पदार्थमात्रांनीं आपापली शक्ति धारण केली आहे. या पृथ्वीवरील जितके स्थावर जंगम पदार्थ, तसेंच आकाशांतील मोठमोठीं प्रचंड लोकमंडलें व लोकनिवासी जीवजंतु, आणि त्याप्रमाणेंच अति सूक्ष्मानुसूक्ष्म चमत्कारिक पदार्थ व जीव यांजकडे बारकाईनें दृष्टि लाविली असतां ईश्वराच्या शक्तीची समाप्ति झालेली दिसत नाहीं. सारांश, त्याच्या शक्तीमध्यें किंचित्‌हि कमीपणा नाहीं. त्याची शक्ति विलक्षण असून तो **सर्वशक्तिमान्** आहे. सृष्टि, स्थिति व प्रलय यांस तोच एक कारण आहे. तो जें कांहीं इच्छितो तें तो करूं शकतो.

**तो नित्य**—त्याचे अनंत गुण काळाबरोबर मिळविले असतां त्यास **नित्य** अशी संज्ञा देतात. तो पूर्वीं होता, आतां आहे व पुढेंहि असेल. जेव्हां हें सर्व

ब्रह्मांड उत्पन्न झालें नव्हतें तेव्हां तो होता, व जरी हें सर्व नाहींसें झालें तरी तो शाश्वत राहीलच. ह्मणून काळाबरोबर त्याचा पालट होत नाहीं. तो **ध्रुव– अपरिवर्तनीय** आहे. तो सर्व काळीं सारखा स्थित असून त्याचा कधींहि विनाश होणार नाहीं.

**तो सर्वव्यापी**– देशेंकरून त्याला सीमा नाहीं. असा कोणताहि देश नाहीं कीं, तो त्याजवर राज्य करीत नाहीं. सर्व सृष्टींत त्याचें वास्तव्य असून अचिंत्य व दूरच्या तारागणांतहि त्याचा वास आहे. असें कोणतेंहि स्थल नाहीं कीं, जेथें तो नाहीं. सर्वांपेक्षां अति निकट जे आह्मीं त्या आमच्या अंतर्यामींहि तो आहे.

**तोच सर्वनियंता**–नियंत्याखेरीज नियम होत नाहीं. ह्मणून कोणत्याहि कार्याची व्यवस्था त्याजशिवाय होऊं शकत नाहीं. नियम ह्मटला ह्मणजे त्याजबरोबर त्याच्या नियंत्यालाहि गणलें पाहिजे. ईश्वर या ठिकाणीं उदासीनासारिखा आहे असें नाहीं; तर तो नियंता व सूत्रधार या रूपानें विद्यमान आहे. त्याच्या नियमांच्या अधीन पदार्थमात्र राहून त्याच्या आज्ञा पालन करिताहेत.

**तोच सर्वाश्रय**—त्याचें अवलंबन करून सर्व आपापल्या कार्यांत नियुक्त राहतात. कारण तो एकटाच सर्वांचा आधारभूत व सर्व त्याचे आश्रित आहेत. पूर्वीं ज्या वेळीं ही सर्व सृष्टि उत्पन्न केली नव्हती तेव्हांहि त्याची सृजनशक्ति त्याच्यांतच अव्यक्तरूपानें होती. पुढें तीच शक्ति कार्यांत परिस्फुट होऊन जें कांहीं उत्पन्न झालें आहे तें सर्वच तिला अवलंबून असून नित्य चालत आहे. जसा वृक्ष आपल्या मुळांपासून निराळा राहूं शकत नाहीं, तसाच **विश्वकर्ता**हि या सर्व जगतापासून वेगळा राहूं शकत नाहीं. तो लोकनाश निवारण्याकरितां सेतुरूप झाला आहे. त्याच्या इच्छेस येईल तर तो एथील सर्व सृष्ट पदार्थांचा एका निमिषांत ध्वंस करून टाकील. परंतु तशा प्रकारचा त्याचा हेतु मुळींच दिसत नाहीं. दिवसानुदिवस या सृष्टीची उन्नतिच करीत जाईल. सारांश, तोच सर्व आधारांचा मूळाधार व सर्व शक्तींची मूलशक्ति आहे.

**तो निराकार**—त्याला कोणत्याहि प्रकारचा आकार नाहीं. कारण जितके साकार पदार्थ तितके जड पदार्थ समजावे, व जितके चैतन्य पदार्थ तितके

निराकार जाणावे. तो ज्ञानस्वरूप आहे ह्मणूनच त्याला कोणतेहि अवयव नाहींत. ईश्वर जड पदार्थ आहे असें मानिलें असतां तो सीमाविशिष्ट होईल आणि तसें असल्यास तो ईश्वरच नव्हे. सर्व जड वस्तूंला अवयव आहेत. त्यांचे तुकडे तुकडे जरी केले तरी त्यांस आकृति व परिमेयता हीं येतात. सूर्यकिरणांमध्यें दृष्टिगोचर होणाऱ्या अति सूक्ष्म कणांसाहि आकार आहे; परंतु ज्ञान पदार्थ तसा नाहीं; तो निरवयव आहे. आमचा आत्मा जसा निरवयव आहे तसा परमात्माहि निरवयव आहे. अतएव जो ज्ञानस्वरूप असून चैतन्यस्वरूप तो निराकार समजावा.

**तोच एक अद्वितीय**—कित्येक लोक, देव अनेक आहेत किंवा तीन असें मानून स्वीकार करितात हा त्यांचा अत्यंत भ्रम होय. जो अनंत पूर्ण चैतन्यमय त्याचे अंश कधींहि होऊं शकणार नाहींत. साकार पदार्थांचे मात्र अंश केले जातात, निराकाराचे केले जात नाहींत. एकाहून अनेक देव आहेत असें मानलें असतां त्यांस **अनंत** अशी संज्ञा देतां येत नाहीं. अतएव जो निराकार चैतन्यमय अनंतस्वरूप तो तीन

नाहीं व त्यांजपेक्षां अनेकाहि नाहीं. **तो एकच मात्र अद्वितीय.** सर्व सृष्टिकौशल्याच्या कार्यकारणांचे नियम त्याच नियंत्यापासून चालू आहेत. दुसरा कोणीहि त्यास साहाय्यकारी नाहीं.

**तोच स्वतंत्र**—त्याचा कोणीहि नियंता नाहीं व तो कोणाच्याहि अधीन नाहीं. सृष्ट पदार्थांच्या घडामोडींत त्याला कोणाचेंहि साहाय्य घ्यावें लागत नाहीं. आह्मी व आमचें जें कांहीं सर्व तें त्याच्या साहाय्यतेच्या अधीन आहे. **तो एकच स्वतंत्र** आहे. त्याच्यां इच्छेप्रमाणें सर्व कांहीं घडून येतें. आपण त्याच्या अधीन राहून त्याचेच्च अभिप्राय संपादन करण्यास झटावें.

**तोच परिपूर्ण आहे**— त्याच्यांत कांहीं एक कमीपणा नाहीं. कारण त्याच्या कोणत्याहि तत्वांचा अंत नाहीं—सीमा नाहीं— व परिमाणहि नाहीं. तो अनंत, अपरिसीम, अपरिमेय पूर्णपदार्थ आहे. त्याची तुलना कोणाबरोबरहि होऊं शकत नाहीं.

**तोच अनाद्यंत**— त्याला आदि व अंत नाहीं. तो **सत्यस्वरूप** व **पवित्रस्वरूप** आहे. त्याजमध्यें कांहीं-एक मलिनपणा नाहीं.

**तो आनंदमय**– जे कोणी त्या आनंदमयाचा लाभ करून घेतात ते परमानंदाचा उपभोग करण्यास तयार होतात. प्रेमळ साधु पुरुष प्रत्येक पदार्थांच्या ठायीं ईश्वराचा अपार महिमा पाहून आनंदसागरांत निमग्न होतात. ईश्वराच्याठायीं दृढ विश्वास न ठेविला तर जीवन शून्यवत् समजावें. जर आपण "मनुष्य" या नांवाचें गौरव राखण्यास इच्छितों तर सर्वसुखदाता जो **परमेश्वर** त्याजवर दृढ भरवंसा ठेवून व अंत:करण-पूर्वक प्रीति करून त्याचें प्रियकार्य साधन करण्यास झटावें.

तोच एक आमचा **सहाय** व **संपत्ति** असें समजून त्याजपासून विच्युत होऊं नये. निशिदिनीं त्याच्याच कार्यांत नियुक्त होऊन आपण आपलें आयुष्य क्रमण करावें व नित्य सुखास पात्र व्हावें. जो **सर्वज्ञ** तोच आमच्या अंतर्यामीं आहे. त्यास अंधकार व प्रकाश हे दोन्हीं समान आहेत. तो आपल्या अंतर्यामीं **सर्वसाक्षी** आहे असें समजून त्याचें प्रिय कार्य साधण्याकरितां तत्पर असावें. तो **मंगलस्वरूप** आहे ह्मणून त्याचा शुभ अभिप्राय ज्यांत संपन्न दिसतो तें संपादन करण्या-

करितां मनापासून झटावें हें उचित होय. आमची इच्छा त्याच्या मंगलमय इच्छेच्याविरुद्ध नसावी. त्यानें आह्मास एथें अशा उद्देशानें पाठविलें आहे कीं, आह्मी ज्ञानधर्मांची प्राप्ति करून घेऊन त्याच्या सहवासास पात्र व्हावें. जर आमची इच्छा व प्रयत्न हीं त्याच्या महान् उद्देशास अनुसरून असतील तरच आमचें कल्याण होईल.

---

## आत्मा.

मनुष्याचें जें प्रकृत नाम त्यालाच **आत्मा** ह्मणतात. ज्ञान, प्रीति व इच्छा हे आत्म्याचे तीन प्रकृत गुण होत. वस्तुतः या तीनच गुणांनीं आत्मा सुघटित झाला आहे. ज्ञानाच्या योगानें सर्व विषय जाणतां येऊन विश्वासाची उत्पत्ति होते; प्रीति ही धर्माची मूलभूमि व इच्छा ही धर्मोपार्जनाचा एकच उपाय होय. या तीन अंगांपैकीं एकाचाहि बिघाड झाला असतां आत्मा नानाप्रकारच्या क्लेशानीं पीडित होतो. अशा स्थितींत त्यास **विकृतात्मा** ह्मणतात. आत्मा या विकृतावस्थेंत असतां भ्रमसागरांत पडून पापाच्या योगानें जडवत् होऊन

जातो, व बुद्धि ही ज्ञानाधीनतेच्या शृंखलेपासून मुक्त होऊन स्वतंत्रपणें नेत्रहीन शरीराप्रमाणें कार्य करीत असते. अशा प्रकारें ती उत्तरोत्तर भ्रमकूपांत पडत जाऊन शेवटीं आपल्या प्रकृत धर्मापासून भ्रष्ट होते. यामुळेंच जगतामध्यें अनेक प्रकारचे **काल्पनिक धर्म** उत्पन्न झाले आहेत.

**आत्मा चेतन पदार्थ**—त्यास कोणताहि आकार नाहीं. ज्ञान, प्रीति व इच्छा हीं तिन्हीं त्याचीं अंगें साकार नाहींत, यास्तव तोहि साकार नाहीं. "**आत्मा**" व "**मन**" या दोन्ही एकासच संज्ञा आहेत. "**मन**" हें आत्म्याचेंच नाम अथवा अवस्थाविशेष आहे. आत्मा ज्या वेळीं ऐहिक कार्यांत रत असतो त्या वेळीं त्यास "**मन**" ही संज्ञा देतात व जेव्हां परमेश्वराच्या भक्तींत असतो त्या वेळीं त्यास "**आत्मा**" ह्मणतात.

**आत्मा अविभाज्य पदार्थ**—त्याचे विभाग करितां येत नाहींत. ज्यास आकार आहे ह्मणजे परमाणुसंयोगानें जो झालेला आहे त्याचेच भाग केले जातात. परंतु आत्मा तसा नाहीं. तो चेतन पदार्थ असून निराकार आहे ह्मणून त्याचे विभाग केले जात नाहींत.

**आत्म्याची प्रकृति व विकृति**—धर्म ही आत्म्याची **प्रकृति** व पाप ही त्याची **विकृति** होय. कित्येकांचा असा समज आहे कीं, पाप हाच आत्म्याचा स्वभाव आहे. हा त्यांचा तर्क खोटा आहे यांत संशय नाहीं. पाप हा मनुष्याचा स्वाभाविक गुण आहे असें ह्मटलें असतां ईश्वरास पापस्त्रष्टा ठरविल्याप्रमाणें होतें. पवित्रस्वरूप परमेश्वर कधींहि पापाचा उत्पन्नकर्त्ता होणार नाहीं. सूर्याच्या तेजापासून जसा अंधकार उत्पन्न होत नाहीं तद्वत् पवित्रस्वरूप परमेश्वरापासून पापाची उत्पत्ति होणें नाहीं. जे कोणी ईश्वराला पापाचा स्त्रष्टा ह्मणतात ते त्याची पूर्ण पवित्रता मान्य करीत नाहींत असें सिद्ध होतें. ईश्वराला पूर्णपवित्र मानिल्यानें असें अविचाराचें वाक्य कधींहि मुखावाटें काढतां येणार नाहीं.

पाप जर आत्म्याची प्रकृति असेल तर धर्म हा मनुष्याची विकृति होईल. अर्थात् तसें झालें तर धर्माचरणच अन्याय ठरतें; कारण आत्मा विकृत असतां त्यास कष्ट भोगावे लागतात. पापाचरण केल्यावर जर कष्ट भोगावे लागतात तर पापास कोणत्या रूपाचा स्वभाव ह्मणावें?

असी हास्यास्पद गोष्ट कधींहि मुखावाटें काढतां येत नाहीं. व्याधीलाच कोणी शरीराचा प्रकृत गुण ह्मटलें तर जसें त्याचें तें ह्मणणें अग्राह्य तशीच वरील गोष्ट अग्राह्य होय. सारांश, धर्मच मनुष्याची **प्रकृति** व पापच त्याची **विकृति** यांत किंचित्‌हि संशय नाहीं.

**आत्म्याची स्वतंत्रता**—आत्मा ज्या वेळीं धर्ममार्गानें वागतो त्या वेळेस त्यास खरी स्वतंत्रता प्राप्त होते आणि जेव्हां तो पापकर्म करितो तेव्हां तो प्रवृत्तीच्या अधीन होऊन स्वातंत्र्यापासून भ्रष्ट होतो. सर्व प्रकारें ईश्वराच्या अधीन राहिलें असतां स्वातंत्र्य रक्षण होतें. जे कोणी ईश्वराच्या अधीन न राहून स्वेच्छाचारी होतात तेच प्रवृत्तीच्या स्वाधीन होऊन पापकर्म करण्यास प्रवृत्त होतात. ईश्वरावर प्रीति करून त्याच्या आज्ञा प्रतिपालन केल्या ह्मणजे स्वतंत्रता राहते. स्वतंत्रताच मनुष्याच्या महत्वाचें कारण होय. मनुष्यास स्वतंत्रता नसती तर तो व पशु यांत कांहींच भेद राहताना. स्वतंत्रता आहे ह्मणूनच मनुष्य सर्व जीवजंतूंपेक्षां श्रेष्ठत्व पावला आहे. स्वातंत्र्याच्या बलानेंच, ईश्वरास प्राप्त करून घेण्याचा त्यास अधिकार आला आहे. त्याच्या मदतीनेंच तो नाना प्रकार-

च्यां विद्या शोधून काढितो. स्वतंत्रतेच्या आश्रयानेंच मनुष्य अज्ञानावस्थेंतून सज्ञानावस्थेंत जाऊन पृथ्वीची श्रीवृद्धि करीत आहे. स्वतंत्रताच उत्कर्षाचें कारण. तेवढी नसती तर आत्मिक किंवा सांसारिक अथवा कोणत्याहि प्रकारची वृद्धि आमच्या दृष्टीस पडती ना.

कित्येकांचें असें मत आहे कीं, "मनुष्यास स्वतंत्रता मुळींच नाहीं. ईश्वर ज्याप्रमाणें करवितो तसें तो कारितो." हें त्यांचें ह्मणणें सुयुक्तिक नव्हे. ईश्वर जसें करवितो त्याप्रमाणें मनुष्यें जर करतीं तर कोणी पुण्यवान् व कोणी पापी, कोणी श्रीमान् व कोणी दरिद्री, कोणी पंडित व कोणी मूर्ख, कोणी सुखी व कोणी दुःखी याप्रमाणें होऊं शकतें ना. कारण ईश्वर निरपेक्ष व मंगलस्वरूप आहे. तो जें करवितो तेंच जर मनुष्यें करतील तर सर्वांची अवस्था एकसारखीच व्हावी यांत कांहींएक संशय नाहीं. अतएव जे स्वतंत्रता कबूल करीत नाहींत ते मोठी चूक करितात. मनुष्य स्वतंत्र ह्मणजे ज्याप्रमाणें कार्य करितो त्याप्रमाणेंच त्यास फळ प्राप्त होतें.

**आत्मा सीमाविशिष्ट आहे**—अर्थात् त्याच्या ज्ञा-

नाची व शक्तीची सीमा आहे. तो सर्वच विषय जाणूं शकत नाहीं व ज्या इच्छा तो करितो त्या सर्वच त्याच्यानें पूर्ण करवत नाहींत.

**शरीर हें आत्माधीन आहे**——शरीर हें एक जड-यंत्रवत् आहे. आत्म्यास जी इच्छा होते ती शरीर-द्वारा संपादन होत असते. असें असतांहि शरीराच्या कोणत्याहि अवयवाची हानि झाली तरी आत्म्याची त्या अवयवद्वारें संपादन करून घेण्याची जी इच्छा ती पूर्ण होत नाहीं. जसा चक्षुंहीन मनुष्य पाहूं शकत नाहीं, हस्तहीन ग्रहण करूं शकत नाहीं व पदहीन चालण्यास समर्थ होत नाहीं, इत्यादि: असें असतांहि आत्म्याच्या ठायीं पाहणें, ग्रहण करणें, व गमन करणें यांची इच्छा होते. केवळ ते अवयव नसल्यानें त्यांच्या क्रियेने ती इच्छा मात्र पूर्ण होऊं शकत नाहीं. सारांश, शरीराचा कोणताहि अवयव नष्ट झाला तरी त्यापासून आत्म्यास तिळमात्र विकार होत नाहीं; कारण शरीरापासून आत्मा सर्वप्रकारें वेगळा आहे.

**चैतन्य व शरीर यांचें भिन्नत्व**—कित्येक असें ह्मणतात कीं, "शरीरामध्यें चैतन्य पृथक् नाहीं, शरीरांतील

समवायी द्रव्याच्या योगानें चैतन्याची उत्पत्ति होते; ह्मणजे ज्या परमाणूंच्या योगानें हें शरीर निर्माण झालें आहे त्याच परमाणुसंयोगानें चैतन्याची उत्पत्ति झाली आहे." याचें उत्तर हेंच कीं, परमाणुमात्र जडपदार्थ आहेत. त्यांच्या अंगीं चैतन्यशक्ति नाहीं ह्मणून परमाणुसंयोगानें चैतन्याची उत्पत्ति होऊं शकत नाहीं. परमाणूंमध्यें जर चैतन्यशक्ति असती तर परमाणुसमष्टि पृथ्वी, पर्वत इत्यादि मोठमोठे जडपदार्थ चैतन्य असते. शरीरांत ज्या परिमाणानें परमाणु आहेत त्यांहीपेक्षां अनेकपट पृथ्वी वै इतर प्रचंड गोलांत परमाणु आहेत. परमाणुसंयोगानें चैतन्यशक्तीची उत्पत्ति होते असें असतें तर मनुष्यांहीपेक्षां पृथ्वी आणि इतर मोठमोठया प्रचंड गोलांमध्यें अधिक चैतन्यशक्ति असती यांत संशय नाहीं; परंतु ज्या अर्थी एकाहि जडपदार्थाच्या अंगीं चैतन्य नाहीं त्या अर्थी उघड होतें कीं, परमाणूंच्या ठायींही चैतन्यशक्ति नाहीं. यावरून परमाणुसंयोगानें चैतन्याची उत्पत्ति होत नाहीं असें सिद्ध होतें.

कोणी कोणी असेंहि ह्मणतात कीं, "परमाणूंमध्यें जरी चेतनाशक्ति नाहीं तथापि त्यांच्या संयोगानें ती उ-

त्पन्न होतें." यास ते 'रसायनशास्त्र' हें प्रत्यक्ष प्रमाण दर्शवितात. कारण रासायनिक शक्तीच्या योगें मिश्रित झालेल्या द्रव्याचें वर्णांतर व गुणांतर होत असतें. जसें चुना व हळद एकत्र केलीं असतां आरक्त वर्ण उत्पन्न होतो; पारा व गंधक मिश्र करून हिंगुळ होतो इत्यादि, अशा समयीं भिन्न भिन्न परमाणुसंयोगानें चैतन्यासारिख्या शक्तीची उत्पत्ति होईल यांत विशेष आश्चर्य तें कोणतें ? जर थोडा वेळ स्थिर मनानें विचार केला तर या सर्व भ्रमाचें निरसन होईल. रासायनिक शक्तीच्या योगें द्रव्याचें वर्णांतर व गुणांतर होतें खरें; परंतु असें असतांहि त्या सर्व वर्णांतर व गुणांतर झालेल्या द्रव्यांच्या जडत्व गुणामध्यें काडीमात्र विपर्यय होत नाहीं. कारण जडवस्तूंच्या संयोगानें जें होईल तें जडच होईल. कार्यकारणांत एकच गुण असतो त्याचा व्यतिक्रम होत नाहीं. बहुत शून्यांनीं संख्येची उत्पत्ति होऊं शकेल काय? असें कदापि होणार नाहीं. अतएव परमाणुसमुच्चयद्वारें शरीराच्या ठायीं चैतन्य उत्पन्न होत नाहीं. चैतन्य हा शरीरापासून सर्व प्रकारें वेगळा पदार्थ आहे. त्यालाच **आत्मा** ह्मणतात. शरीर हें आत्म्याचें घर होय. त्याचा

नाश झाला तरी आत्म्याची कांहींएक हानि होत नाहीं. वायूनें पूर्ण भरलेलें पात्र एक न होतां जशीं तीं दोन्हीं द्रव्यें पृथक् पृथक् असून त्या पात्राचा भंग झाला तरी त्यांतील वायु यत्किंचित्हि नष्ट होत नाहीं, त्याप्रमाणेंच शरीर व आत्मा हे पृथक् पदार्थ आहेत; यांतून शरीर नष्ट झालें तरी आत्मा नाश पावत नाहीं. तशांत आत्मा अनंतकालस्थायीहि आहे.

**आत्मा अविनाशी पदार्थ**—कित्येक लोकांचा असा समज आहे कीं, "जरी शरीर व आत्मा हे दोन्ही निरनिराळे पदार्थ आहेत तरी शरीराच्या नाशाबरोबर त्याचाहि नाश होतो." ही देखील त्यांची मोठी चूक आहे. जगत्संबंधी कोणत्याहि वस्तूचा विनाश होत नाहीं हा तत्त्वज्ञान्यांचा सिद्धांत त्यांस माहित नसल्यामुळें ते असें बोलतात. शरीराचा ज्या वेळीं नाश होतो त्या वेळीं तें परमाणुसमष्टीपासून निराळें होऊन त्याच्या प्रत्येक परमाणूमध्यें परिणत होतें, व त्या परमाणूंतील एकाचाहि विनाश होत नाहीं. आत्मा जर परमाणुसमष्टि जड पदार्थ असता तर शरीराप्रमाणेंच वियुक्त होऊन परमाणूंमध्यें परिणत होऊन जा-

ता. पूर्वीं दर्शविलेंच आहे कीं, आत्मा परमाणुसंयोगानें झाला नाहीं. तो वेगळाच चैतन्य पदार्थ आहे. त्या अर्थीं आत्म्याचा वियोग होण्याचा देखील कांहीं एक संभव नाहीं. कित्येक असेंहि ह्मणतात कीं, "सृष्टिसंबंधी कोणत्याहि वस्तूचा विनाश होत नाहीं यास प्रमाण काय?" त्यास प्रमाण हेंच आहे कीं, ईश्वराच्या सृजन इच्छेचा खंड न झाला तर जगतांतील एकाहि वस्तूचा विनाश होणार नाहीं. कारण सृजन इच्छेचा विराम झाल्याशिवाय नाश इच्छेची उत्पत्ति होत नाहीं. या दोन्ही इच्छा कधींहि एका काळीं होऊं शकत नाहींत. तशांत ईश्वर या सर्व ब्रह्मांडाचा विनाश करून टाकील असल्या गोष्टीवर आह्मी विश्वास ठेवूं शकत नाहीं. परमेश्वरानें हें विश्व नाश करण्याकरितां उत्पन्न केलें नाहीं. भूतत्त्ववेच्या पंडितानींहि असा निश्चय ठरविला आहे कीं, या जगाची क्रमशः उन्नति होत आहे. यावरून उघड समजण्यांत येतें कीं, परमेश्वर उत्तरोत्तर या सृष्टीची उन्नतिच करील; परंतु विनाश करणार नाहीं. अतएव आत्मा अनंतकालस्थायी आहे यांत कांहीं संशय नाहीं.

**आत्म्याचें अनेकत्व**--कित्येक असें मानतात कीं, "आत्मा एकच असून तोच सर्व मनुष्यांच्या शरीरांत व्याप्त होऊन राहिला आहे." याचें उत्तर हेंच कीं, जर सर्व मनुष्यांचा एकच आत्मा असता तर सर्वांच्या मनांचा भाव, सुखदुःख, शोकताप, पापपुण्य इत्यादि मानसिक व्यापार एकाच प्रकारें होते, सर्व एकमेकांचे मनोभाव समजूं शकते, एकमेकांमध्यें निरनिराळे भाव राहिले नसते व सर्वांचा जन्ममृत्युहि एकाच समयीं होता. परंतु तसा कांहीं एक प्रकार या जगामध्यें आढळत नाहीं. संपूर्ण विपरीत प्रकारच आढळतात. यास्तव हा जो त्यांचा समज तो केवळ उपहासास पात्र आहे. सारांश, प्रत्येक मनुष्याचा आत्मा निरनिराळा आहे असें पूर्णपणें समजावें.

**करुणामय परमेश्वर आत्म्याचा प्राण आहे**--शरीरांत आत्मा नसला तर तें जसें प्रेत होतें तद्वत् आत्मा ईश्वरावांचून झाला तर मृतप्राय होतो. मत्स्य जसे जलामध्यें सजीव राहतात व त्यावांचून मरून जातात तद्रूप आत्माहि ईश्वररूप अमृतसागरांत जिवंत राहतो व ईश्वरावांचून नाश पावेल.

**ईश्वराचा व आत्म्याचा निकट संबंध**—आत्म्याशीं ईश्वर जितका निकट आहे तितका दुसरा कोणीहि नाहीं. जीवात्मा व परमात्मा यांच्यामध्यें आकाशाचें देखील व्यवधान नाहीं. बालक मातेच्या हृदयाशीं जसें सुखानें राहतें तसा जीवात्माहि परममाता जो परमेश्वर त्याच्या हृदयाशीं अवस्थिति करितो. प्रेम-स्वरूप परमेश्वर हृदयबंधुरूपें प्रत्येक आत्म्याच्या अंतरीं विराजित आहे. जीवात्म्याला ईश्वराशिवाय आपली अशी दुसरी कोणतीहि वस्तु नाहीं. कदाचित् सर्व पदार्थांसुद्धां या संसाराचा एक दिवस नाश होईल परंतु परमेश्वराशीं आमचा नित्यसंबंध आहे. त्यामुळें आह्मी अनंतकाळ त्याचा लाभ घेऊन नित्यसुखाचा उपभोग करूं. जो कोणी मनुष्य जन्मास येऊन ईश्वर-प्राप्ति करून घेत नाहीं त्याचा तो जन्म वृथा समजावा. या जन्माचें सार्थक करून घेण्याची जर तुमची इच्छा असली तर सर्वकाळ आत्म्याच्या ठायीं ईश्वर-प्राप्ति करून घेऊन कृतकृत्य व्हावें. ईश्वररहित आत्म्याच्या दुःखास पार नाहीं ह्मणून परमात्म्याला सदैव आपल्या हृदयांत बाळगावें.

# मनुष्यमात्राची एक जाति.

या देशांत ज्या प्रकारें जातिभेदाचा प्रचार चालला आहे तो अवलंबन केला असतां ईश्वराचा अपमान केल्यासारिखें होतें. अर्थात् भयानक पातकांत पडण्याचें हें एक कारण होय. पवित्रस्वरूप परमेश्वर प्रत्येक मनुष्याच्या ठायीं विराजमान आहे. तो कोणालाहि नीच अथवा अस्पृश्य असें मानीत नाहीं. पूर्वींच दर्शविलें आहे कीं, 'ईश्वर आत्म्याचा प्राण आहे.' तो जर कोणालाहि अस्पृश्य असें समजेल तर त्या मनुष्याचा नाश होईल. दयाळू परमेश्वर कोणाचाहि त्याग करीत नाहीं. परंतु तो सर्वांवर ममता करितो आणि प्राणासारिखा प्रत्येक आत्म्यामध्यें राहून आनंदाचें दान करितो. आतां विचार करून पाहणें योग्य आहे कीं, ज्या अर्थीं विश्वपति परमेश्वर कोणत्याहि मनुष्यास नीच व अस्पृश्य असें समजत नाहीं त्या अर्थीं क्षुद्र मनुष्य असून कोणत्या साहसानें इतर मनुष्यांला नीच व अस्पृश्य असें समजूं शकतो ? असला जात्यभिमान बाळगला तर आपण आपणास ईश्वरापेक्षां श्रेष्ठ मानतों

असें होत नाहीं काय? जो कोणी आपण ईश्वरापेक्षां श्रेष्ठ होण्याची इच्छा धरितो त्याजपेक्षां दुसरा महा· पापी कोण आहे? वास्तविक पाहिलें असतां मनुष्यांच्या आकृतिप्रकृतींमध्यें जातिभेदाचें कांहीं एक चिन्ह दिसत नाहीं. प्रत्येक मनुष्याच्या शरीराची रचना व मनाची वृत्ति सारखीच आहे. ह्मणून कोणत्याहि मनुष्यामध्यें जातिभेदाचें एकहि विशेष चिन्ह पाहण्यांत येत नाहीं. जातिभेद जर असता तर मनुष्यांच्या आकृति भिन्न असत्या यांत कांहींएक संदेह नाहीं. पाहा: पशुपक्ष्यांमध्यें जातिभेद आहेत; कारण त्यांच्या आकृति भिन्न भिन्न आहेत. जसें सिंह, व्याघ्र, अश्व, हत्ती, हंस, बगळा, कावळा, सारस, मयूर इत्यादि. याप्र· माणेंच जेथें जातिभेद आहे तेथें आकृतीचा भेद आहे. परंतु मनुष्यांमध्यें तसा जातिभेद नाहीं; कारण त्यांच्या अकृतींमध्यें भिन्नता नाहीं. सारांश, मनुष्यांमध्यें जातिभेद नाहीं. . जे जातिभेद बाळगतात ते ईश्वरा· च्या मंगलाभिप्रायाविरूद्ध आचरण करितात. परमे· श्वर सर्व मनुष्यांचा पिता असल्यामुळें मनूष्यमात्राचें पर· स्परांशीं भाऊबहिणींचें नातें आहे.

# धर्म.

ईश्वराच्याठायीं अंतःकरणपूर्वक प्रीति स्थापन करून त्याचें प्रिय कार्य साधन करणें यालाच **धर्म** ह्मणतात. आत्म्याचा प्रकृत भावच धर्माची प्रकृतावस्था समजावी. धर्म अनेक प्रकारचे नाहींत. धर्म एकच असून तो नित्य व सत्य आहे. परमेश्वरानें एकाच सत्य धर्माला मनुष्यमात्राच्या त्राणाकरितां उत्पन्न केलें आहे. त्याच सत्य धर्माला आह्मी **ब्राह्मधर्म** किंवा **प्रकृतधर्म** असें ह्मणतों. हा **ब्राह्मधर्म** ह्मणजे **परम धर्म** इतर काल्पनिक धर्मांसारिखा नाहीं. जो सत्य तोच **ब्राह्मधर्म**. ब्राह्मधर्मच या असीम विश्वराज्याचा एक धर्म होय. ब्राह्मधर्माच्या आज्ञांतून कांहींना कांहींतरी प्रतिपालन करीत नाहीं असा कोणीहि मनुष्य नाहीं. जो सत्य बोलतो, परोपकार करितो, अथवा ईश्वरभक्तीवर ज्याचें लक्ष्य आहे तो त्या त्या अंशीं ब्राह्मधर्म प्रतिपालन करितो. कारण सत्य, परोपकार, व ईश्वरभक्ति हीं ब्राह्मधर्माच्या अंगांपैकींच अंगें होत. याप्रमाणें कोणीहि कोणत्याहि परिमाणानें धर्मपालन कां करीना, तरी तो ब्राह्मधर्म त्या परिमा-

णानें पालन करीत आहे असें समजावें. यास्तव **"धर्म"** हा शब्द उच्चारिला ह्मणजे ब्राह्मधर्मव्यतिरिक्त आणखी धर्म समजूं नये. हा परम पवित्र ब्राह्मधर्म युक्ति व तर्क यांच्या अधीन नाहीं. हा मनुष्याच्या ठायीं स्वभावसिद्ध उत्पन्न होतो. मनुष्य जोंवर प्रकृतीला अनुसरून राहतो तोंपर्यंत कधींहि ब्राह्मधर्माबाहेर पाऊल टाकीत नाहीं. परंतु ज्या वेळेस तो विकारातें पावतो त्या वेळीं स्वाभाविक ज्ञानाकडे लक्ष्य न देतां केवळ आपलीच बुद्धि चाळवून धर्म जाणायाची इच्छा करीत असतां, प्रकृतधर्म जो **ब्राह्मधर्म** त्यापासून भ्रष्ट होतो, आणि काल्पनिक धर्मांचा प्रचार करितो; नाहीं तर नास्तिक होऊन जातो. अशा कारणांनींच अनेक कल्पनिक धर्मांची व नास्तिक मताची उत्पत्ति झाली आहे.

**ईश्वरप्रणीत धर्मपुस्तक एकाहि नाहीं**—परमेश्वरानें प्रत्येक मनुष्याच्या अंतरीं धर्माची स्थापना केली आहे. धर्मच मनुष्याचें जीवन. कारण धर्मलाभ करण्याकरितां परमेश्वर जर त्यास याप्रमाणें साधारण अधिकार न देता तर पृथ्वीवरील सर्व लोक धर्मापासून भ्रष्ट हो-

ऊन पशूंसारिखे आपला काळ क्रमण करिते. जे कोणी असें ह्मणतात कीं, ईश्वरानें आपला धर्म एका पुस्तकांत लिहून दिला आहे ते मोठी चूक करितात असें समजावें. अशानें ईश्वराला केवळ निर्दय व अज्ञ ह्मणण्यासारिखें होतें. पृथ्वीच्या पाठीवर अद्यापि असेहि कित्येक लोक आहेत कीं, ज्यांस किंचित्‌हि वर्णज्ञान नाहीं व कित्येकांस तर त्या पुस्तकाचें नांव देखील माहीत नाहीं. ईश्वरानें तसल्या लोकांस धर्मलाभ करण्याचा अधिकार दिला नसेल काय ? ते लोक धर्मप्राप्तीचे अधिकारी असून जर त्यांस त्या ईश्वरदत्त धर्मपुस्तकाची माहिती नसली तर त्यांस धर्म मुळींच नाहीं काय ? असें जर आहे तर ईश्वरानें त्यांना तें पुस्तक कां बरें दिलें नाहीं ? तर काय त्या दयामय परमेश्वरानें त्यांस केवळ पातकांत पाडण्याकरितांच उत्पन्न केलें आहे ? अशी भयंकर गोष्ट बोलून आपल्यास दूषित करील असा पाषाणहृदय मनुष्य कोण आहे ? धर्माचें ज्ञान करून घ्यावयास जर ईश्वर एकादें पुस्तक देतो असें ह्मणावें तर ज्या भाषेंत तें पुस्तक लिहिलें असेल तीच सर्वांची एक भाषा असती यांत संशय नाहीं. परं-

तु ज्या अर्थी भिन्न भिन्न भाषा चालू आहेत असें आपण पाहतों त्या अर्थी कोणत्याहि प्रकारें वर सांगितलेली गोष्ट बोलवत नाहीं. जेव्हां आपण पाहतों कीं, पंडित व मूर्ख आदिकरून सर्व मनुष्यांस धर्मप्रकृति आहे तेव्हां स्पष्ट समजूं शकतों कीं, धर्म जाणण्यासाठीं परमेश्वरानें कोणतेंहि एक विशेष पुस्तक दिलें नाहीं. त्यानें प्रत्येक मनुष्याच्या अंतर्यामीं धर्मबीज पेरून ठेविलें आहे. मनुष्य स्वाभाविक ज्ञानावर लक्ष्य ठेवून ज्या परिमाणानें बुद्धीची चालना करील त्या परिमाणानें तें धर्मबीज परिस्फुट होईल.

**धर्मच मनुष्याचें जीवन**– मनुष्य जितका काळ धर्माचरणांत घालवितो तितकाच काळ त्याचें यथार्थ जीवन होय. जो मनुष्य शंभर वर्षें या संसारांत राहून त्यांपैकीं वीस वर्षेंपर्यंत मात्र धर्म साधन करितो तर त्याचें वास्तविक जीवन २० वर्षेंच समजावें. बाकीचीं ८० वर्षें त्याच्या यथार्थ जीविनांत गणलीं जात नाहींत. गर्भावस्थेंतील बाळकाचे दशमास जसे त्याच्या जीविताअवस्थेमध्यें धरले जात नाहींत त्याप्रमाणेंच अधार्मिकाचें आयुष्य त्याच्या बाजवी जीवनांत गणलें जात नाहीं.

कार्यावरूनच कालनिरूपण केलें जातें. मनुष्याचें मुख्य कर्तव्यकर्म धर्मच होय. अर्थात् जे कोणी तें प्रकृत कार्य न करतील तर त्यांचें जीवन यथार्थ जीवनांत गणलें जाणार नाहीं. जसें एकाद्या चाकरानें आपल्या धन्याची चाकरी कित्येक दिवस न केली तर तो धनी त्यास त्या दिवसांचें वेतन देत नाहीं; कारण धनी आपल्या सेवकाचा अनुपस्थितिकाळ गणीत नाहीं. त्याप्रमाणेंच अधार्मिकाचें जीवित यथार्थ जीवनामध्यें गण्य होणार नाहीं, धार्मिकाचेंच होईल. अतएव धर्मच मनुष्याचें जीवन. सदोदित धर्ममार्गानें वर्तणें हेंच त्याचें एक कार्य होय. जे कोणी धर्माची अवज्ञा करितात त्यांच्या पेक्षां मूर्ख कोणीहि नाहीं. आतां ते जरी कित्येक ऐहिक तुच्छ सुखोपभोगाकरितां धर्माचा अनादर करीत आहेत, तथापि मृत्यु त्यांस एका पळांत त्या सर्व सुखांपासून वेगळें करील. अशा प्रकारचे लोक असें समजूनाहि उमजत नाहींत. ज्या वेळीं मृत्यु त्यांस त्यांच्या अतुल ऐश्वर्याच्या व स्नेहभरित परिवारांच्या मधून बलात्कारानें घेऊन जाईल त्या वेळीं कोणीहि त्यांच्या बरोबर जाणार नाहीं. जसे एकटे

आले होते तसे एकटेच निघून जातील. यास्तव क्षण-भंगुर विषयसुखासाठीं नित्य सुखास मुकणें हें अत्यंत मूर्खाचें काम होय. धर्मच मनुष्याचें कार्य असें जेव्हां कळतें तेव्हांपासूनच प्राणप्रतिज्ञेनें धर्माचरण करूं लागावें. धर्ममार्गानें चालत असतां जर कोणी दुष्ट लोक हातीं तरवार घेऊन आपला सुमार्ग भंग करून टाकण्याकरितां प्रवृत्त होतील तर अनायासें आपलें मस्तक त्यांजपुढें करावें, परंतु धर्मपथाचा त्याग करूं नये. हें क्षण-भंगुर शरीर देऊन जर धर्मलाभ होत आहे तर त्याच्यापेक्षां आणखी अधिक लाभाचा विषय कोणता? धर्म-प्राप्तीसाठीं साम्राज्य परित्याग करून दारोदार भिक्षा मागूनहि आयुष्य क्रमण करणें हें कर्त्तव्य होय. परंतु धर्माचा परित्याग करून सम्राट् होणें उचित नव्हे. अतएव प्राणप्रतिज्ञेनें धर्ममार्गानें चालावें व कोणत्याहि प्रकारें धर्मापासून भ्रष्ट होऊं नये.

जे कोणी मुखावाटें 'धर्म धर्म' हे शब्द मात्र काढतात परंतु धर्माच्या कार्यांत मन घालीत नाहींत त्या कपटाचारी लोकांच्या पापास सीमा नाहीं. धर्मोपदेश नुसता तोंडानें केल्यानें मनुष्य धार्मिक होतो असें नाहीं. प-

रंतु जर तो तोच उपदेश कार्यांत आणील तर तो धार्मिक होऊं शकेल. अतएव वाचाळ धार्मिक होऊन कपटरूप पापांत पडूं नका. जेव्हां धर्म ह्मणून तुह्मांस अवगत होईल तेव्हांपासूनच त्यास कार्यांत योजीत जा.

**धर्मच मनुष्याचें भूषण**— करुणालय परमपिता जो परमेश्वर त्यानें आपल्या बालकांस अमूल्य धर्मभूषणाचा अधिकार दिला आहे. स्वर्णालंकार जसा सुंदर रत्नांनीं जडित होतो तद्वत् विश्वास, प्रीति, व अनुष्ठान या तीन तेजस्वी रत्नांनीं अमोलिक धर्मभूषण सुशोभित होतें. यत्नपूर्वक हें धर्मभूषण लेऊन मनापासून त्याचें पालन करा, व संसाराच्या वृथा सुखांत विमोहित होऊं नका. सारांश धर्माचें प्राणापलीकडे पालन करावें.

## संसार.

या पृथ्वीलाच **संसार** ह्मणतात. संसार हें आमच्या शिक्षेचें स्थान होय. एथील नानाप्रकारच्या परीक्षांत पार पडून व धर्मशिक्षेची प्राप्ति करून घेऊन

तो धर्म अनंत काळ आपल्याबरोबर जागृत राहील असें केलें पाहिजे. याकरितांच सरळ मनाचे साधु पुरुष या संसारास **धर्मक्षेत्र** असें ह्मणतात. सज्जन लोक हा संसार अमृतमय जाणून आनंदयुक्त मनानें आपला काळ घालवितात. ते असें ह्मणतात कीं, आमच्या हृदयबंधूनें आह्मांस या जगतामध्यें अशासाठीं पाठविलें आहे कीं, आह्मी अंतःकरणपूर्वक त्याचें इच्छित कार्य करून अमोलिक ब्रह्मानंदाची देणगी मिळवावी. ते सांसारिक किंवा कुटुंबप्रतिपालन हें एक ईश्वराचें कार्य जाणून आनंदानें निर्वाह करितात; व पदोपदीं ईश्वराचें कार्य पाहून आनंद पावतात. तसल्या साधुजनांची उज्ज्वल मुखश्री अवलोकन करून लोभ दूर पळून जातो व दुष्प्रवृत्ति लज्जेनें अधोमुख होऊन पळावयास मार्ग पाहतात. ईश्वरप्रिय साधुजन या संसारांतील प्रत्येक घटनेला मंगलमय असें समजतात. त्यांचा दृढ विश्वास असा आहे कीं, मंगलमय परमेश्वराच्या राज्यांत कधींहि अमंगल घटना व्हावयाची नाहीं. ते जरी उदरनिर्वाहाकरितां कष्ट करितात तरी तेंहि मंगलासाठींच करितात असें स्पष्ट दिसतें.

हा जगत्संसार अमृतमय असून त्यास असाधुजन विषतुल्य समजतात. ही मोठी आश्चर्याची गोष्ट होय. कारण तो त्यांच्या समोर भयंकर मूर्ति धारण करितो. दुष्प्रवृत्ति व प्रलोभन हीं त्यांवर अनेक प्रसंगीं घाला घालून शेवटीं त्यांस दुःसह क्लेशसागरांत बुडवितात. ते त्याच्या भयंकर लाटांत पडल्यावरहि दुष्प्रवृत्ति व प्रलोभन यांच्या दासत्वाच्या सांखळीनें बांधलेले असतात; तथापि ते कांहीं समजूं शकत नाहींत. हा संसार त्यांस बंदिशाळेसारखा जरी आहे तरी ते त्यांतच राहण्याची इच्छा करितात. याजपेक्षां आश्चर्यकारक दुसरें काय आहे?

परमेश्वरावर दृढ विश्वास आणि प्रीति असली म्हणजे हाच संसार आनंदमय वाटतो. ईश्वरावर प्रीति ठेवून व त्याचें प्रिय कार्य साधून संसारांत आल्याचें सार्थक करा. यास्तव जगत्पतीच्या पदीं लक्ष्य ठेवून व्यावहारिक कार्य करीत असावें. आपल्या कीर्तीचा विस्तार व्हावा म्हणूनच जे कोणी आपल्या कर्तव्यकर्माचा निर्वाह करितात त्यांचे ते सर्व श्रम निष्फळ होत. कारण ईश्वराच्याठायीं लक्ष्य ठेवून जें कार्य केलें जात

नाहीं तें धर्मांत गणिलें जात नाहीं. दुर्विषयांत आसक्त न होतां सदाचरण करणें हाच एक उद्देश साधन केला तर अमृतफल प्राप्त होतें. केवळ संसारसाधन करणें हा आमचा उद्देश नव्हे; परंतु परमप्रेमास्पद जो परमेश्वर त्याची प्राप्ति करून घेणें हाच आमचा उद्देश होय. कारण हें जगत् आमचा विदेश आहे. एथून केव्हां आपल्या देशांत गमन करण्याचा वेळ येईल त्याचा नेम नाहीं. अतएव सर्वदाच स्वदेशीं जाण्याची तयारी ठेविली पाहिजे. सृष्टि हें एक मोठें गृह, आह्मी सर्व मनुष्यें मिळून एक कुटुंब आणि करुणामय परमेश्वर ही आमची गृहदेवता आहे. ह्मणून कोणत्याहि मनुष्यास परका समजलें असतां ईश्वराची आज्ञा उल्लंघन करण्यासारिखें होतें. सारांश, परमेश्वराच्याठायीं प्रीति ठेवून व त्याचें प्रिय कार्य साधून परलोकास जाण्याकरितां निशिदिन तयार असावें. स्वदेशांत अमृतमय विमलानंद प्राप्त होईल.

# परकाल.

मृत्यूनंतर ज्या काळांत आत्मा अवस्थिति करितो त्यालाच **परकाल** ह्मणतात. मनुष्य ज्या परिमाणानें पवित्र होत जाईल त्या परिमाणानें परकालीं उन्नत लोकांत वास करील, आणि अनंतकाळपर्यंत उन्नत लोकाहून उन्नत लोकीं गमन करीत जाईल. आत्म्याची उन्नति उत्तरोत्तर होत असते. जसें एकादें बीज पेरलें असतां लागलच तें फलपुष्पांनीं सुशोभित होत नाहीं, परंतु प्रथम अंकुर फुटून मग क्रमेंकरून त्यास कांड, शाखा व प्रशाखा येऊन नंतर तें फलपुष्पांनीं सुशोभित होतें. अशीच मनुष्याचीहि क्रमशः उन्नति होत जाते. तो ज्या दिवशीं जन्मास येतो त्याच दिवशीं त्यास वृद्धत्व प्राप्त होतें असें नाहीं; तर बाल्यावस्थेनंतर यौवनावस्था व तदनंतर वृद्धावस्था. याप्रमाणें अनुक्रमानें त्याची वृद्धि होत जाते. परंतु शा-

रीराच्या वृद्धीचा जसा या पृथ्वीवरच शेवट होऊन जातो तसा आत्म्याच्या उन्नतीचा शेवट या पृथ्वींत होत नाहीं. जी वस्तु जितका काळ राहणारी असेल तितका काळ तिची उन्नति होईल. शरीर अल्पकाळ राहणारें आहे ह्मणून शरीराची उन्नति अल्पकाळानें संपून जाईल. आत्मा हा अनंतकालस्थायी आहे ह्मणून त्याची उन्नति अनंतकाळ होईल. कित्येक मनुष्यांच्या आत्मोन्नतीचा प्रवाह एथूनच वाहूं लागतो व कोणाच्या उन्नतीचा लोट प्रवाहित होऊन पुढें बंद पडतो आणि कित्येकांच्या उन्नतीचे ओघ अगदींच चालत नाहींत. याप्रमाणें तीन प्रतींचे आत्मे एथून परलोकीं गमन करितात. जे कोणी या ठिकाणीं प्रतिदिवशीं धर्माचेंच उपार्जन करितात त्यांच्या उन्नतीचे स्रोत एथूनच प्रवाहित होत असतें. जे कोणी कांहीं काळ धर्ममार्गानें चालून पुढें अधर्माचरण करितात त्यांच्या उन्नतीचें स्रोत कांहीं दिवस प्रवाहित होऊन पुढें बंद पडतें. तसल्या मनुष्यांस त्यांच्या धर्माचरणाचें फळ परकालांत कधींहि मिळणार नाहीं. कारण पापपीडेनें त्यांची सुखावस्था लुप्त होऊन जाते.

त्यांच्या व कनिष्ठ अवस्थेंतील लोकांच्या उन्नतीच आरंभ परकालीं प्रायश्चित्तानंतर होईल.

**पापाचा दंड– ( नरक )–** आत्मग्लानीची दुःसह यातना हाच पापाचा दंड होय. ती यातना इतकी प्रबळ असते कीं, अग्निपीडा तिजपुढें कांहींच नाहीं. या यातनेलाच **नरकयातना** ह्मणतात. याशिवाय नरक नामें दुसरें विशेष स्थान नाहीं. पापी लोक प्रायश्चित्त करीत तोंपर्यंत आत्मग्लानीची दुःसह यातना भोगीत असतां दग्ध होतात. त्या भयंकर यातनेचें नांव मनांत आणलें असतां हृदयांतील रक्त शुष्क होऊं लागतें. अशा महाक्लेशाग्नीमध्यें इच्छापुरस्सर जळून जाण्याची इच्छा करील असा कोण शतमूर्ख आहे! हे पापी लोकहो, असल्या यातनेपासून तुमची सुटका कोण बरें करील? तुह्मी ज्या ऐश्वर्याकरितां व कुटुंबपरिवाराकरितां अधर्माचरण केलें आहे तें ऐश्वर्य व तो परिवार त्या वेळीं कोठें असेल? तुह्मी ज्याकरितां मनुष्यजीवन नष्ट करून या भयानक दुर्विपाकांत पडलां आहां त्या तुमच्या यातना दूर करण्याकरितां त्यांतून कोणीहि पुढें होणार नाहीं. त्यावेळीं तुमची दशा काय

होईल? तुमच्या तारणाचा तुह्माला दुसरा उपाय नाहीं काय? हे बंधुजनहो! तुह्मी फार दिवस आपला पिता जो परमेश्वर त्याची अवज्ञा करून त्याच्या आज्ञा पाळल्या नाहींत ह्मणून पाहा, तो पिता वज्र उगारल्याप्रमाणें महाभयंकर रूपानें तुह्मास शिक्षा करीत आहे. अझून तरी ऐका! अद्यापि तरी अनुतप्त हृदयानें त्या आपल्या पित्याच्या चरणांवर पडून रूदन करा. ह्मणजे तो दयामय परमेश्वर अवश्य तुमचा उद्धार करून आपल्या शांतिरूप हृदयाशीं तुह्मांस कंवटाळील.

जे कोणी ह्मणतात कीं, पापाची शिक्षा अनंतकाळ **नरक** आहे. हाहि त्यांचा एक मोठा भ्रम होय. ईश्वराच्या अनंत दयेकडे जर ते लक्ष्य देतील तर असें निष्ठुर वाक्य काढण्यास त्यांस भय वाटेल. ज्या परिमाणाचें पाप त्या परिमाणानें त्यांस दंड होईल. नाहींतर ईश्वर न्यायवान् राजा असें कोण ह्मणेल? मनुष्य सीमाविशिष्ट असल्यामुळें त्यानें कितीहि पाप केलें तरी त्या पापास सीमा असेलच असेल. असें जर आहे तर त्या सीमाविशिष्ट पापाचा दंड अनंतकाळ **नरक** असावा काय? आपल्या वालकाचें बरें करण्यासाठीं जसें त्यास

पिता शिक्षा करितो किंवा राजा जसा चोरादिकांस बऱ्याकरितां दंड करितो तसा ईश्वरहि पाप्यांचा उद्धार करण्याकरितां दंड करितो. तस्मात् तो दंड कधींहि अनंत होऊं शकणार नाहीं. अतएव पापाचा दंड अनंत **नरक** असें मानणें हा मोठा भ्रम होय, यांत किंचित्‌हि संशय नाहीं.

**स्वर्ग**—पुण्यवान् लोक परकालांत ब्रह्मानंदरस अनुभवीत आनंदलहरींत मग्न असून, नित्य ब्रह्मोपासनेनें अनंत उन्नतीचा लाभ घेतात. यालाच **स्वर्ग** ह्मणतात. **स्वर्ग** ह्मणून दुसरें विशेष स्थान नाहीं.

**पुनर्जन्म**—मनुष्य मेल्यावर पुनः या पृथ्वींत जन्म घेणार नाहीं. पृथ्वीवर पुनः जन्म घेणें याचें नांव **पुनर्जन्म**. **पुनर्जन्म** आहे असें मानिलें तर आत्मोन्नतीच्या मार्गांत कांटे टाकण्यासारिखें होतें. मृत्यूनंतर पुनः मनुष्य जर या पृथ्वीवर जन्म धारण करितो असें मानिलें तर त्याची उन्नति कोणत्या प्रकारें होईल? पूर्वीच्या जन्माची कथा आठवत नसल्या कारणानें उन्नति होऊं शकत नाहीं. पूर्वींच्या मंदावस्थेपासून उत्तमावस्था प्राप्त होणें हाच

" उन्नति " या शब्दाचा अर्थ आहे. अर्थात् पूर्वावस्थेचें स्मरण न राहिलें तर उन्नति होऊं शकत नाहीं. पृथ्वीवरील एकाहि मनुष्याला पूर्वावस्थेचें स्मरण आहे काय? कोण मनुष्य पूर्वावस्था स्मरून उन्नत होण्याचा यत्न करीत आहेत? असे कोणीहि नाहींत. कोणी कोणी असें ह्मणतात कीं, बालपणींच्या अवस्थेचें स्मरण राहत नाहीं; असें असतां आमची बाल्यावस्था नव्हती काय? असे लोक जर थोडा विचार करून पाहतील तर हा त्यांचा संशय लवकरच दूर होईल. आपल्या कोणत्या अवस्थेचें स्मरण ठेवणें आवश्यक आहे? ज्या अवस्थेंत आह्मी पाप करितों त्या; परंतु कोणीहि बाल्यावस्थेंत पापकर्म करीत नाहीं, ह्मणून त्या अवस्थेचें स्मरण ठेवणें आवश्यक नाहीं. अतएव पुनर्जन्माचा कोणत्याहि प्रकारें स्वीकार करणें हें बुद्धिमानास उचित नाहीं. मनुष्य परकालामध्यें पापपुण्यांचें फळ भोगील, व उत्तरोत्तर त्याची अनंत काळ उन्नति होत जाईल.

# प्रायश्चित्त.

**पापापासून निवृत्त होणें**—पापापासून मुक्त होण्याकरितां अनुतप्त हृदयानें ईश्वरास शरण जाऊन त्याची प्रार्थना करणें यालाच **प्रायश्चित्त** ह्मणतात.

दुसऱ्या मनुष्यानें भोजन व औषध सेवन केलें असतां जशी आपली क्षुधा व रोग यांची शांति होत नाहीं; तद्वत्च एकानें प्रायश्चित्त केलें तर तेणेंकरून दुसऱ्याचें पातकमोचन होत नाहीं.

शरीराचें रक्त दान करणें हें पापाचें प्रायश्चित्त नव्हे; अनुतापच पापाचें प्रायश्चित्त होय. जे कोणी शरीर व आत्मा यांचा भेद विशेषप्रकारें समजले आहेत तेच अनुतापाला पापाचें प्रायश्चित्त ह्मणतील; परंतु रक्तदानाला कधींहि ह्मणणार नाहींत. शारिरिक नियम उल्लंघन केला असतां जी पीडा होते तिचें प्रायश्चित्त औषध आहे. कारण जडाचें प्रायाश्चित्त जडच व पापाचें प्रायश्चित्त अकृत्रिम अनुताप होय; हें समजण्यास मोठा तर्क पाहिजे असें नाहीं. जलपानानें तृषा हरण होते याविषयीं

कोणी तर्क काढतात काय? कोणीहि नाहीं. अनुतापच अध्यात्मिक पीडेचें महौषध होय. हें अंतरदृष्टीनें पाहिलें असतां निःसंशय कळून येईल.

---

# मुक्ति.

प्रायश्चित्तानंतर निर्मळ हृदयानें सर्वप्रकारें ईश्वराच्या अधीन होऊन नित्य त्याच्या समागमसुखाचा उपभोग घेणें याला **मुक्ति** ह्मणतात. यां मुक्तीची अवस्था अनंत-कालस्थायी आहे. आनंदस्वरूप ईश्वराच्या सहवासांत किती अपार आनंद प्राप्त होईल हें ज्यानें त्या स्वरूपाचें इहलोकीं दर्शन घेऊन ब्रह्मानंद अनुभविला आहे तोच समजूं शकेल. तो आनंद वाचा व मन यांस अतीत आहे. जर ही निर्मलावस्था प्राप्त करून घेण्याची तुह्मी इच्छा करितां तर प्रतिक्षणीं ईश्वराच्याठायीं रत होऊन त्याचें प्रियकार्य साधन करून घ्या.

---

# सुखदुःख.

आत्मप्रसादाला **सुख** व आत्मग्लानीला **दुःख** ह्मणतात. विषयसुखाला सुख ह्मटलें जात नाहीं; तें केवळ दुःखाचेंच कारण. जे कोणी ईश्वराच्याठायीं लक्ष्य ठेवून सांसारिक सर्व कार्यें संपादन करितात त्यांचें तें सांसारिक सुख वास्तविक सुखांत परिणत होतें. परंतु जे कोणी ईश्वरास विसरून सांसारिक सुखाचा उपभोग घेतात त्यांजमध्यें त्या प्रकृत सुखाचा अभाव समजावा. सांसारिक दुःखाला वास्तविक दुःख ह्मटलें जात नाहीं. अन्न, वस्त्र किंवा द्रव्य हें नसल्यानें जें दुःख होतें तें खरें दुःख नव्हे; पापयातना हेंच यथार्थ दुःख समजावें. ईश्वरावर प्रीति ठेवून त्याचें प्रियकार्य साधन केल्यानें आत्मा संतुष्ट होतो तेंच यथार्थ सुख होय. याप्रमाणें सुखदुःखाचा जे अर्थ समजले आहेत ते पुनः संसाराच्या सुखदुःखानें मोहित होत नाहींत. बहुतकरून सर्व लोक विषयलालसेनें पतित होत्साते यथार्थसुखाचा परित्याग करून ऐहिक विषतुल्य सुखाचें सेवन करितात. अतएव विषयलालसेपासून वेगळे राहून अमृतमय सुखाचा

उपभोग घेण्यास समर्थ व्हावें, ईश्वरावर प्रीति करून त्याचें प्रिय कार्य साधन करीत नित्यसुखाचा उपभोग घेत असावें.

---

## आत्मोन्नति.

ज्ञान, प्रीति व इच्छा यांस समानतेनें नित्य उन्नत करीत गेलें ह्मणजे **आत्मोन्नति** होते. केवळ एका ज्ञानाची किंवा प्रीतीची अथवा इच्छेचीच उन्नति झाली असतां **आत्मोन्नति** झाली असें समजूं नये. या तीनहि गुणांच्या सारिख्या उन्नतीलाच **आत्मोन्नति** ह्मणतात. परंतु ही उन्नति कांहीं दिवस चालवून पुढें बंद केली तर ती आत्मोन्नति नव्हेच असें समजावें. आत्मोन्नति एक किंवा दोन दिवसांत होत नसते. त्याची उन्नति अनंतकाळ अखंडतेनें केली पाहिजे. या उन्नतीलाच यथार्थ किंवा प्रकृत धर्म व जीवन ह्मणतात. याजकरितां अंत:करणपूर्वक आत्मोन्नतीचा लाभ करून घ्यावा. कारण ईश्वराचा सहवास हेंच आत्मोन्नतीचें मधुर फळ होय.

---

# प्रार्थना.

प्रार्थना करणें हें मनुष्यास स्वभावसिद्ध आहे. ती युक्ति अथवा तर्कद्वारें करावयास नको. संकटसमयीं किंवा अगत्याच्या वस्तूचा अभाव असला ह्मणजे प्रार्थनेचा आपल्या आपणच उदय होतो. बालकास क्षुधा लागली असतां तिच्या निवारणार्थ तें रडून, आईची नम्रतेनें प्रार्थना करितें त्यावेळीं तें युक्ति किंवा तर्क यांचें अवलंबन करीत नाहीं. तसेंच मनुष्य पाण्यांत बुडत असतां आपला जीव वांचावा ह्मणून आसपासच्या मनुष्यांजवळ साह्यास येण्याकरितां मोठ्या गहिंवरानें विनवितो. त्या वेळीं तो युक्ति व तर्क करण्याच्या खटपटींत काळ घालवीत नाहीं. येणेंकरून उघड समजण्यांत येतें कीं, प्रार्थना ही मनुष्यास स्वभावसिद्ध आहे. संकटाच्या वेळीं प्रार्थनेची आवश्यकता पडते. त्यावेळीं इच्छापूर्वक प्रार्थना केल्याशिवाय कोणी राहतच नाहीं. बहुतकरून प्रत्येक मनुष्यास असल्या परीक्षेचा अनुभव आला असेल असें आह्मांस वाटतें. यावरून संकट-

निवारणार्थ प्रार्थना करणें हा एक ईश्वराचा नियमच दिसतो. अशा समयीं प्रार्थना केल्याशिवाय राहवतच नाहीं. करुणाकर परमेश्वरानें अभाव जाणण्याचें आह्मास सामर्थ्य देऊन त्यानें आपली अपार करुणा दाखविली आहे. तो जर आह्मास ही योग्यता न देता तर उन्नति व धर्म कशाला ह्मणतात हें आह्मांस कोणत्याहि प्रकारें अवगत झालें नसतें. ह्मणजे तसें असतें तर मनुष्य व पशु यांमध्यें कांहींएक प्रभेद राहिला नसता. करुणालय परमेश्वरानें आपणास अभाव जाणण्याची शक्ति देऊन उन्नतिलाभ व धर्म यांची शिडी दाखविली आहे. ह्मणून प्रार्थनाद्वारा उन्नतिलाभ करून धर्माच्या उंच शिडीवर चढावें. प्रार्थना हेंच आमचें बल, प्रार्थना हाच धर्माचा प्राण आणि प्रार्थनाच उन्नतीचें सोपान होय. अतएव ईश्वराजवळ सरळ भावानें प्रार्थना करून आत्म्याचें मोठें संकट दूर करावें.

# ईश्वरदर्शन.

अति व्याकुल होत्सातें एकाग्रचित्तानें ईश्वराची प्रार्थना करीत गेलें असतां त्याच्या स्वरूपाची आत्म्यामध्यें उपलब्धि होते. त्यालाच **ईश्वरदर्शन** ह्मणतात. जसा सूर्योदय झाला ह्मणजे प्रकाश होतो तसाच आनंदस्वरूप परमात्मा हृदयाकाशांत उदित झाला असतां आनंदकिरण हृदयांत व्याप्त होतात. त्यावेळीं शरीर रोमांचित होऊन नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागतात. हा आनंदच ईश्वरदर्शनाचें चिन्ह होय. यास्तव एकाग्रचित्तानें त्याचें चिंतन करावें ह्मणजे अवश्य त्याचें दर्शन होईल.

# उपासना.

उपासनेच्या पूर्वीं ईश्वराचें दर्शन झालें पाहिजे. ईश्वराचें दर्शन घेतल्यावांचून कित्येक वाक्यांच्या उच्चारणानेंच त्याची उपासना घडत नाहीं. त्याचें नित्य

दर्शन घेऊन पापापासून सुटका होण्याकरितां त्याच्या जवळ प्रार्थना करणें, त्याची अपार करुणा मनांत आणून त्याजला कृतज्ञतोपहार इत्यादि अर्पण करणें व त्याचें अनंत ज्ञान, अनंत शक्ति व अनंत मंगलभाव हीं सर्व मनांत आणून भक्तिरसानें व प्रीतिपुष्पांनीं त्याची पूजा करणें यालाच **उपासना** ह्मणतात. या उपासनेचा भाव सर्वदां मनांत ठेविला पाहिजे. जगांतील प्रत्येक वस्तु अवलोकन करून त्या परमात्म्याचा महिमा वर्णन करावा. घटकाभरहि त्याला विसरून अनाथाप्रमाणें रडूं नये. जनीं विजनीं त्याची उपासना करावी, तेणेंकरून इह व परकालीं विमलानंद प्राप्त होईल.

---

## उपदेश.

ईश्वरावर दृढ विश्वास नसल्यानें प्रीतीचा उदय होत नाहीं. प्रीति नसली तर प्रिय कार्य साधन करितां येत नाहीं. ईश्वरावर ज्याचा विश्वास नाहीं त्याचें हृदय पाषाणवत् समजावें. त्यानें केलेलें कोणतेंहि

पाप दडून राहत नाहीं. निर्मळ ब्रह्मानंदाच्या रसाचा स्वाद घ्यावयास तो कधींहि समर्थ होत नाहीं. कष्टाळू शेतकरी जलरहित शुष्क वाळवंटांत स्वादिष्ट फळें उत्पन्न होण्याची आशा करितो काय? ईश्वरावर दृढ विश्वास ठेवावा व त्याजवर प्रीति करून त्याचें प्रिय कार्य साधावें. सदा सत्य बोलावें. प्राणांतींहि खोटें बोलूं नये. हास्यविनोदाच्या वेळींहि असत्य भाषण अनुचित होय. एक खोटी गोष्ट बोलल्यानें जर राज्याची प्राप्ति होत आहे तर तीहि तृणवत् समजावी. एक मिथ्या गोष्ट न बोलल्यानें जर हजारों लोक तरवारींनीं मारावयास पाहतील तर त्यांस किंचित्‌हि न भितां सत्यसंरक्षणास्तव प्राण अर्पण करावा; परंतु सत्यापासून भ्रष्ट होऊं नये. ईश्वरापाशीं प्रार्थना करीत असतांना उपयोगी धैर्यास्त्र अवलंबन करून इंद्रियांचें दमन करावें. त्यांचें दमन केलें नाहीं तर मनुष्य धर्मापासून भ्रष्ट होतो. अतएव इंद्रियदमन करण्याकरितां सर्वदा झटत असावें. सर्व मनुष्यांवर प्रीति करावी. दरिद्र्यास धन व रोग्यास औषध पाणी देत जावें. नम्रता व विनय यांचें भूषण ल्यावें. मनापासून परोप

कार करावे. आईबापांची प्रीतिपूर्वक सेवा करावी. जसें तोंडानें बोलावें तसें चालावें. बोलण्याप्रमाणें करणें नसलें तर कपट केल्यासारिखें होतें. ह्मणून मूर्त्तिपूजेशीं संबंध ठेवूं नये. जानवें इत्यादि मूर्तिपूजकपणाचें कोणतेंहि चिन्ह धारण करूं नये. जे कोणी मूर्तिपूजकपणाशीं संबंध ठेवून जानवें इत्यादि चिन्हें धारण करितात ते जरी ब्राह्म ह्मणवीत असले तरी तो मोठा दांभिकाचार समजावा. जो कोणी मूर्तिपूजकपणा सोडून शांत आणि समाहित चित्तानें ईश्वरावर प्रीति करितो व त्याचें प्रिय कार्य साधून घेतो त्यालाच ब्राह्म ह्मणावें. याप्रमाणें ब्राह्म व्हावें. पापकल्पना मनांत आणूं नयेत, त्यांच्या गोष्टी बोलूं नयेत आणि पापकर्म प्राणांतींहि आचरूं नये. ईश्वरावर लक्ष्य ठेवून निर्वाहाचीं कार्यें संपादन करावीं. विद्याध्ययन किंवा कुटुंबप्रतिपालन अथवा अर्थोपार्जन हीं सर्व कार्यें ईश्वराचीच आज्ञा असें समजून संपादन करावीं. कीर्ति वाढविण्यासाठीं एकहि कार्य करूं नये. देवाची किंवा देवीची पूजा करणें, जातिभेद मानणें इत्यादि हा जसा मूर्तिपूजकपणा तसाच कीर्ति व इंद्रियाधीनता हाहि

मूर्तिपूजकपणा होय. या दोहोंप्रकारच्या मूर्तिपूजकपणापासून सर्व प्रकारें निवृत्त होऊन अद्वितीय ईश्वराचें उपासक व्हावें. जसें ईश्वराला पिता ह्मणून समजतों तसेंच प्रत्येक मनुष्याला बंधु समजून त्यावर अकृत्रिम प्रीति करावी. याप्रमाणें जीवनास मधुमय करीत धर्माच्या उंच सोपानावर आरोहण करावें.

---

समाप्त.

# ब्रह्मोपासना.

## आराधना.

॥ सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म आनंदरूपममृतं ॥

॥ यद्विभाति शांतं शिवमद्वैतं शुद्धमपापविद्धम्. ॥

तूं सत्य, तुझी सर्व ठिकाणीं जीवंत व गंभीर सत्ता आहे. तूं सर्व विश्वाचें आश्रयस्थान, तूं चेतन व अचेतन अशा सर्व पदार्थांचा मूळाधार. तुझ्या योगानें आह्मीं जीवंत राहून वास करितों. तुजवांचून सर्वहि असार व मिथ्या आहे. हे सर्वत्र विद्यमान ईश्वरा! तूं आमच्या जीवनाचें जीवन आहेस.

तूं ज्ञानरूप, तुझें अपार ज्ञान जळीं स्थळीं व आकाशांत प्रतिबिंबून राहिलें आहे. चोहोंकडे कसें सुंदर कौशल्य व आश्चर्यकारक नियम दिसताहेत, आह्मांवर तुझे असंख्य ज्ञानचक्षु लागून राहिले आहेत. आमचीं बाह्य व आंतरिक सर्व पापें तूं पाहत आहेस.

तुझ्या या दृष्टीच्या उजेडांत आह्मीं कोठेंहि लपूं शकत नाहीं. तूं सर्वज्ञ, तूं अंतर्यामी व सर्वसाक्षी आहेस.

तूं अनंत, तुला आरंभ नाहीं, तुला समाप्ति नाहीं. तूं काळेंकरून नित्य, देशेंकरून सर्वव्यापी; तुझ्या उच्चतेचें व गंभीरतेचें परिमाण कोण करील ? हें विशाल विश्व तुझ्या पायांखालीं मोहरीच्या कणासारिखें आहे. तूं इंद्रियांस अगोचर, तूं विचारास अतीत, तूं महान् भूमा, तूं पूर्णब्रह्म आहेस.

तूं आनंद, अमृत, आणि शांतीची खाणी आहेस. तूं दुःखितास सुखी करितोस, तूं तापलेल्या प्राणास शीतल करितोस, तूं अमृत होऊन मृत्यूच्या यातनांचा परिहार करितोस, तुला पाहिलें असतां, तुझी मधुर कथा ऐकिली असतां व तुझ्या जवळ बसलें असतां हृदय फारच शीतल होतें. तूं सुखसिंधु व हृदयरंजन आहेस.

तूं शिव व मंगल आहेस. सहस्र मुखांनीं हें जगत् तुझ्या दयेचा महिमा वर्णीत आहे. बापाप्रमाणें आह्मास तूं स्नेहानें व यत्नानें पोषितोस, व अन्न वस्त्र व ज्ञान धर्म देऊन आह्मांस सुखी करितोस. जे

तुला मानीत नाहींत त्यांवरहि तूं ममता करितोस. दुःखग्रस्त पाप्याचा तूंच सहाय आहेस. तूं दयाळू, बालवत्सल व प्रेमसिंधु आहेस.

तूं अद्वैत, तुजशिवाय दुसरा नाहीं. हें समस्त विश्व तूं एकट्यानेंच उत्पन्न केलेंस. तूं एकटा या सर्वांचें रक्षण व शासन करीत आहेस. असंख्य जीवांचा, अगण्य आत्म्यांचा, तूं एकच आश्रयदाता होस. चोहोंकडे केवळ तुझ्याच नांवाचा जयध्वनि उठत आहे. तूं सर्वांचा राजा, सर्वांचा प्रभु, तूंच एक आमचा सहाय व आशेचा भरंवसा आहेस.

तूं शुद्ध, अपापविद्ध, व निर्मळस्वभाव आहेस. तुझी इच्छाच पुण्याचा आदर्श आहे. तुझ्या पुण्याचें तेज असें आहे कीं, त्याचा एक किरण प्राप्त झाला असतां पाप्याच्या हृदयांतील अंधकार दूर होतो; तुला एकदां मनांत आणिला असतां जीवन पवित्र होतें. हे धर्ममूर्ते ! तुझ्या भयानें पाप पलायन करितें. तुझ्या न्यायाच्या विचारासमोर पापी कधीं प्रश्रय पावत नाहीं. तुझ्या अधिकारानें दुष्टाचें दमन होतें. तूं पुण्याचा सूर्य, धर्माचें स्थान, व पाप्याचा परित्राता आहेस. हे

देवा ! आह्मीं सर्व तुला शरण आलों आहों. ऐहिक व पारत्रिक कल्याणाकरितां तुजवर भार घालितों. तूं आमचा स्तवनीय व संभजनीय आहेस. हे जगदीश ! आह्मीं तुला वंदन करितों. हे दीनबंधो, सकल कुटुंबाच्या पित्या, पाप्यास तारणाऱ्या, आह्मी तुला नमस्कार करितों.

---

## ध्यान.

ज्याची आह्मीं सर्वांनीं आराधना केली त्याचें प्रत्येकानें आतां आपल्या मनांत ध्यान करावें. या देहमंदिरांत हृदयामध्यें तोच अंतरात्मा सर्वदा अधिवास करीत आहे. तो चक्षूंचा चक्षु, कर्णांचा कर्ण, मनाचें मन, व प्राणाचा प्राण आहे. तो चिरकाल आह्मापाशीं असून आमचें रक्षण करितो. तो आमचें अनंत जविन. हें जड जगत् सोडून, बाहेरील सर्व व्यापार विसरून एकत्यानें डोळे झांकून एकांत हृदयराज्यांत प्रवेश करावा. तेथला अंधकार नासून हृदयाच्या खोल स्थानीं प्रेमाच्या

आसनावर प्रेमनाथाला पाहून व पवित्र होऊन त्याच्या अनंत सहवासास योग्य व्हावें.

---

( सर्वांनीं क्षणभर स्तब्ध राहून ध्यान करावें, नंतर उभे राहून पुढील प्रार्थना बरोबर करावी.)

## प्रार्थना.

असत्यापासून आह्मास सत्याप्रत ने; अंधकारांतून आह्मास प्रकाशांत आण; आणि मृत्यूपासून आह्मास अमृतामध्यें घेऊन जा. हे **सत्यस्वरूप** ! आह्मापाशीं तूं प्रकाशित हो. हे दयाळा ! तुझी जी अपार करूणा तिच्या द्वारें आमचें सर्वदा रक्षण कर.

॥ शांतिः शांतिः शांतिः ॥

---

## प्रणाम.

हे दयाळा ! तूं आह्मास तुझ्या चरणांचा आश्रय दे. आह्मी सर्व भाऊ व बहिणी मिळून श्रद्धेने व भक्तीने तुझ्या मुक्तिप्रद चरणांस प्रणाम करितों.

# प्रार्थना.

## ईश्वरास्तित्व.

हे सर्व जगाच्या उत्पादका आणि नियामका परमेश्वरा ! आकाशांत त्वां उत्पन्न केलेले गोल, व त्यांतील ही पृथ्वी, तिजवरील वातावरण, उदक, अग्नि, पर्वत, धातु, वृक्ष आणि प्राणी, हीं सर्व आह्मीं प्रत्यक्ष पाहतों, आमच्या मनोभावना व आत्मिकभाव यांची आह्मांस निःसंशय प्रतीति आहे. हे जगत्कारणा ! हीं सर्व तुझीं कृत्यें निर्नायक नगरासारिखीं श्रीहीन किंवा उद्ध्वस्त होऊन पडलेलीं असीं दिसत नाहींत; परंतु तुझ्या सृष्टीचे व्यवहार नांदत्या राजासारिखे ऐश्वर्यसंपन्न अचुक व्यवस्थेनें सुयंत्र चालले आहेत असें आह्मीं सर्वत्र स्पष्ट पाहतों. यांचा सर्वसमर्थ नियंता तूं आहेस तो मात्र दिसत नाहींस, हा आमच्या दुर्बल हृदयाचा भ्रम, हे निग्रहानुग्रहसमर्थ प्रभो ! तूं कृपा करून दूर घालीव. तुझी या विश्वांतील व्यापक सत्ता, शक्ति, चिन्मयता, प्रीति आणि आनंद यांचा आह्मांस

पूर्ण बोध होऊंदे. तुझ्या सत्तेचा आमच्या हृदयास निभ्रांत विश्वास वाणूंदे, वाह्य विषयांच्या मोहानें आमचीं मनें वावरीं होऊं देऊं नको, आमच्या अचपळ भावनांचा आवर करण्याची शक्ति देऊन, आमचे आत्मिक सद्भाव तुझ्या सत्पदाच्या अचल आधारास संलग्न कर, हीच प्रार्थना आहे.

---

## प्रातःकाळ.

हे दयाळू ईश्वरा ! तुझ्या कृपेनें गेली रात्र निर्विघ्नपणें घालवून आज आह्मी या नव्या दिवसांत प्रवेश केला आहे. आज कृपा करून तूं आह्मास पापविचार, पापगोष्टी व पापकर्में यांपासून राख आणि असें बल दे कीं, जेणेंकरून आह्मी तुझे दास होऊन तुझ्या कार्यांत सर्व दिवस काया वाचा मनानें नियुक्त असूं.

---

## सायंकाळ.

हे दयाळु ईश्वरा ! आज तूं आह्मास नानाप्रकारचे रोग, विपत्ति, व पापें यांपासून रक्षिलेंस, आणि अन्न-

वस्त्र व ज्ञानधर्म हीं दिलीं आहेस, यास्तव आह्मी तुझी स्तुति करितों. आह्मी आज जीं कांहीं पापें केलीं आहेत त्यांपासून आमचा उद्धार कर आणि दिवसानुदिवस आह्मास पुण्यमार्गात अग्रेसर कर.

### जेवणाचे पूर्वी.

हे दयाळु पित्या! आमचे शरीरपोषणार्थ ही जी खायाची सामग्री तूं आह्मास स्नेहानें दिली आहेस इजकरितां कृतज्ञ मनानें तुझ्या चरणीं आह्मी प्रणाम करितों.

---

### साधारण प्रार्थना.

जयसच्चिदानंद सर्वसमर्थ परमेश्वरा! तूं या स्थिरचर संपूर्ण विश्वाचा जनक आहेस. सर्वांची उत्पत्ति, पालन आणि लय करणारा तूंच एक होस. आह्मांस तूं ज्या स्थितींत निर्माण केलेंस, त्या स्थितीप्रमाणें आह्मी तुझी मर्त्य, अल्पज्ञ, सुखदुःख भोगणारी, व पराधीन प्रजा आहों. आह्मी काय करावें, आणि कसें असावें, याचा सर्व आधार तुझ्या इच्छाशक्तीवर आहे, असें समजण्यास तुझ्या भक्तिवांचून आह्मी कधींहि शक्तिमान् होणार नाहीं. यास्तव तुझ्या ठायीं आमच्या अंतः-

करणाचा शुद्ध आणि प्रेमळ भक्तिभाव आकर्षून घे. आमच्या हृदयाची दुर्बलता, भ्रांति, मोह, आणि अज्ञान, हें सर्व दूर कर, दुष्ट वासना, व दुर्विकार यांचें दमन कर, आणि तुझ्या आज्ञेच्या सन्मार्गांत पुढें आह्मांस चालायास तुझ्याच साहाय्यानें धीर यावा, ह्मणून तूं आमचीं सर्व पातकें दया करून क्षमा कर. आमचे स्वभाव निर्मळ व सात्विक कर. आह्मीं तुझीं लेंकरें ह्मणायास योग्य होऊं, असें आचरण आह्मांस करितां येऊंदे. तुझ्या प्रीतींत सर्व बंधूंची प्रीति साधितां येईल असी आह्मांस शक्ति दे. "आणि हे दयानिधे ! आमचा सर्व विश्वास, प्रीति, आणि आशा हीं तुझ्या सुरम्य पदीं संयुक्त कर. हीच प्रार्थना.

## अरिष्टनिवारणार्थ.

हे जगत्कारण जगज्जीवन जगदीश ! या विश्वाच्या नियमनार्थ तुझ्या अगम्य योजनेने भयंकर रोगांच्या सांथी, झंझावाताचीं वादळें, उदकाच्या अति वृष्टीनें नद्यांस अमर्याद पूर, अग्नीची धाड, अनावृष्टीनें दुष्काळ,

भूमिकंपादि उत्पात, परचक्राचे उपद्रव, युद्धजनित नाश, अकालीं मृत्यु, आणि आकस्मिक अनर्थ इत्यादि महाअरिष्टें उपस्थित होतात. हीं टळविण्यास तुज-शिवाय दुसरा कोणी समर्थ नाहीं, तुझे इच्छेस आड येईल असा कोणी नाहीं. हे जगन्नियंत्या देवा! आमचा तूं परम दयाळू प्रियरूप सौम्य पिता असतां 'महद्भयं वज्रमुद्यतं' वज्र उगारलेला असा महाभयंकर दिसतोस. आह्मी तुला विसरतों, तुझ्या आज्ञारूप सन्मार्गापासून भ्रष्ट होतों, त्या आह्मां लेंकरांस मार्गावर आणण्याचें कार्य, या तुझ्या योजनेंत साधावें, ह्मणून हे उपाय योग्य आहेत. यांत जरी तुझे उत्तम संकल्प, आणि भव्य हेतु आहेत, तरी ह्या तुझ्या घटना, आह्मा दीन, अशक्त, व अज्ञान लेंकरांस परम उग्र भासून दुःसह भयदान कारितात. येणेंकरून आह्मी अत्यंत भयभीत, व्यथित, व घाबरे होतों. अशा प्रसंगीं हे पतित पावन! हे देवाधिदेव! हे करुणा-निधे परमेश्वर! तूं दया करून आमच्या सर्व अपराधां-ची क्षमा कर. आह्मीं तुला शरण आहों, आह्मी तझे आज्ञानुवर्ती दास होण्यास, व तुझें परम सुख अनु-

भविण्यास निभावले जाऊं, अशा प्रकारें सर्व अरिष्टांत आमच्या चित्तांचा, व जीवांचा बळकट धीर, व भरंवसा तूं हो. आमच्या सर्व मनोवृत्ति अनन्य भावानें तुझ्या भक्तींत रंगवून, त्यांस कोणत्याहि आपदेपासून भय आणि व्यथा बाधेनाशी कर. आह्मास तुझ्या कृपेच्या पंखाखालीं घेऊन तूं आमचें संरक्षण कर, सर्व संकटांचा परिहारक तूं हो. तूं आमचें दुर्ग, परम आश्रय, आणि परम गति हो. हे दीनदयाळा प्रभो ! तुला स्वस्ति असो, अशा समयीं तूं आह्मावर शांत व प्रसन्न हो. आणि व्याकुलता, व व्यग्रता यांतून आमच्या चित्तांस सोडवून, आमचीं मनें कृतज्ञतेनें तुझी स्तुति, व भक्ति करण्यास तत्पर, आणि स्वस्थ होतील असें तूं दयाभावानें कर हीच प्रार्थना आहे.

---

## योग्यतानिवेदन.

हे सर्वसमर्थ परमेश्वरा ! त्वां जीं उत्पन्न केलेलीं तुझीं इतर कृत्यें तीं, तुझी अगम्य लीला, अतुल पराक्रम, अगाध ज्ञान, अद्भुत शक्ति, अपार प्रीति, अपरंपार

दया, अनुपम औदार्य आणि सनातन ऐश्वर्य यांस प्रदर्शित करितात. परंतु आह्मीं तुजपासून उत्तम मनोभाव व असंख्य उपकार पावलेले असून काय करतों आहों ? आमचा उपयोग काय ? अनन्य भावानें आह्मी तुजवर दृढतर विश्वास ठेवून, आपल्या स्थितीची सर्व चिंता, व भार तुजवर टाकून द्यावा; आणि स्वस्थ चित्तानें तुझी प्रीति धरावी; तुझ्या पवित्र व हितकर आज्ञा उत्साहानें जपून पाळाव्या हें आह्मांस योग्य होतें. दुसऱ्यानें तुला अन्य वस्तूनें संतुष्ट करावें, असी तुजमध्यें कांहीं आनंदाची न्यूनता नाहीं. तूं स्वयें सदा स्वानंदरूप प्रभु आहेस, तुजपासून उलटा दुसऱ्यास आनंद होतो, जरीं आह्मीं तुझा सन्मान केला नाहीं, किंवा तुझें यश वर्णिलें नाहीं; तरीं तुझें महत्व, व तुझी कीर्ति, प्रकट झाल्याशिवाय राहणार नाहीं; आणि उणीवहि व्हावयाची नाहीं. तूं परिपूर्ण सर्व सद्गुणांचा कंद आहेस, तुला कशाचीहि गरज नाहीं; परंतु आह्मां दुर्बळांस बहुत गोष्टींची गरज आहे. तूं कृपाळू होऊन उदारपणें जगास आवश्यक अर्थ पुरवितोस; यास्तव आह्मीं कृतज्ञ होऊन तुझे उपकार मानावे, तुझी स्तुति

व भक्ति करावी, जेणेंकरून तुझा सन्मान होईल व तूं संतोष मानून घेसील असी वर्त्तणूक आह्मीं ठेवावी, आह्मीं तुझें यथार्थ महत्व वर्णावें, तुझीच शुद्ध कीर्ति वाखाणावी हें आमचें उचित कर्तव्य व हा आमचा वास्तविक धर्म असतां, हे दयानिधे देवा ! आह्मीं तुला विसरलों, आह्मीं मोह, मद, गर्व, कपट व द्वेष इत्यादि दुर्विकारांस वश होऊन, नाशवंत स्वार्थ व मान मात्र शोधिला; यांत वास्तविक पाहतां आपला नाश संपादिला. बाह्यात्कारें तोंडानें मात्र तुला भजतोंसें दाखवून मनापासून तुझा विश्वास व प्रीति धरिली नाहीं, अंतर्यामीं तुझी प्रीति धरून तुझ्या आज्ञेप्रमाणें चालायास प्रयत्न केला नाहीं, बंधुजनांशीं असत्यानें, द्वेषानें, गर्वानें व अन्यायानें वागलों, तुझ्या भक्तींत खचित आमचें हित व मान आहे असें न समजून, तुझ्या आज्ञेबाहेर पाऊल टाकून भ्रष्टलों, आणि दुःखास पात्र झालों, ही आह्मीं फारच अश्लाघ्य, व दूषणार्ह गोष्ट केली. आमच्या पाशीं कांहीं योग्यता राहिली नाहीं. तर आतां हे करूणानिधे बापा ! तूं आमचा मोह दूर करून, दयेनें आमच्या अपराधांची क्षमा कर; आणि

आह्मांस तुझा पवित्र मार्ग दिसून, त्यांत चालायाची शक्ति येऊंदे. हे जगदुद्धारका ! आमच्या जन्माचें सार्थक होईल असें कर, हीच प्रार्थना.

## परिवार.

हे प्रेममय कुटुंबाच्या देवता ! आह्मी सहकुटुंब मिळून नम्रतेनें तुला हाक मारितों, तूं आह्माला एक वेळ दर्शन दे. तुझी पूजा करून आह्मी जीवन पवित्र करितों. आह्मी तुझेच पुत्र व कन्या, तुझेच दास व दासी आहों. आह्माला तुझ्या चरणांचा आश्रय देऊन या संसारास धर्माचा संसार कर; असें कीं, जेणेंकरून आह्मी तुला बाप समजून तुझी भक्ति करूं, आणि सद्भावानें एकमेकांच्या उपयोगीं पडूं असें कर. हे पित्या ? तूं आह्मास राग, हिंसा, लोभ, व विषयासक्ति यांपासून मुक्त कर, व आमचें सगळें जीवन पुण्यमार्गीं लाव, जेणेंकरून आह्मी तुझीं योग्य लेंकरें होऊन या कुटुंबांत सर्व काळ पवित्र शांतिसुखाचा उपभोग घेऊं.

## एक प्रभु.

आह्मी सतरा प्रभूंचे दास होऊन मारले जात आहों. कधीं धन, कोठें मान, कधीं आईबाप, कधीं भार्या, केव्हां पुत्रकन्या, आणि कधीं स्वदेशाची सेवा करूं लागतों. मन नेहमीं विक्षिप्त असतें, व हृदयाचा अनुराग अनेक विषयांच्या ठायीं लागतो. यांतून कोणताहि प्रभु आह्मास प्रसन्न झाला नाहीं, आणि आह्मीहि कोणाच्या सेवेंत सुखी झालों नाहीं. आह्मास आतां असें समजलें आहे कीं, एकाग्र चित्तानें तुझ्याच चरणांची सेवा केली असतां शांति पावूं. हे प्रभो ! तूं आह्मास आपलेंसें कर.

## अधैर्य.

हे बापा ! आमचें मन फार अधीर. हा दोष सामान्य असा समजून याची आह्मी किती उपेक्षा केली आहे. परंतु जेव्हां आह्मी विचार करून पाहतों तेव्हां

पेगेंकरून आमचें फार अनहित झालें आहे असें दिसून येतें. आह्मी एकादा विपत्तींत पडलों असतां घाबरून निराश होतों आणि धर्माचीं सर्व कामें सोडून देतों. किती वेळां आमचा विश्वास देखील डळमळीत होत असतो. तर तूंच असल्या भित्र्या मनास कृपा करून अधैर्यापासून वांचीव.

---

## दयेचा भरंवसा.

हे दयाळा ! आह्मी तुझ्या प्रेमाचा अविश्वास धरूं नये. दुःख आणि विपत्ति यांत तुझा मंगल हस्त आह्मावर सदोदित असावा. तूं सुख संपदा देऊन लेकरांस जशी कृतज्ञता शिकवितोस तशीं विघ्नें व कष्ट यांत आह्माला धैर्य, सहनता, विनय व वैराग्य हीं शिकीव. मग आह्मी संकटांत पडलों असतां तुझ्या दयेचा संशय कां धरूं ? हे पित्या ! आह्मी सुखदुःखादि सर्व आवस्थेंत तुलाच अनुसरून वागावें.

## ईश्वरजननी.

हे जगज्जननि ! या संसारवनामध्यें आह्मांला तुझा पदर धरूंदे; आह्मांला फार भय वाटतें. किती शत्रु चोहोंकडे आणि मनांत आमचा वध करायास नेहमीं टपले आहेत ! ! आह्मी अति दुर्बळ, त्यांच्या हल्ल्यांतून निभवण्याची आह्मास शक्ति नाहीं. निराश्रित व असाह्य लेंकराप्रमाणें आह्मी तुला हांका मारितों. दया करून तूं आमचें रक्षण कर.

## पापापासून परित्राण.

हे पतित पावन ! आह्मी कोणत्या पापापासून तरावें ह्मणून तुजपाशीं प्रार्थना करूं ? पातकापासून आमचा उद्धार कर असें जेव्हां ह्मणतों, तेव्हां एक नाहीं; पण असंख्य आणि नाना प्रकारच्या पातकांचें स्मरण होतें. तूं साक्षी होऊन पाहात आहेस कीं, आमचें मन प्राय: सर्व प्रकारच्या पापांनीं दूषित झालें आहे. अहंकार,

स्वार्थपरता, हिंसा, काम, क्रोध, कपट, अविश्वास, निराशा, व संसाराची आसक्ति अशीं आमच्या मनांत सर्व पापें गुप्तपणें राहिलीं आहेत. हीं वेळोवेळ पेट घेतात. हे तारणाऱ्या, या महापाप्यास सर्व दोषांपासून तुझ्या कृपेच्या योगानें मुक्त कर. आतां ह्यांच्या ज्वाला सहन होत नाहींत ! !

**समाप्त.**

असें होत नाहीं काय? जो कोणी आपण ईश्वरापेक्षां श्रेष्ठ होण्याची इच्छा धरितो त्याजपेक्षां दुसरा महा-पापी कोण आहे? वास्तविक पाहिलें असतां मनुष्यांच्या आकृतिप्रकृतींमध्यें जातिभेदाचें कांहीं एक चिन्ह दिसत नाहीं. प्रत्येक मनुष्याच्या शरीराची रचना व मनाची वृत्ति सारखीच आहे. ह्मणून कोणत्याहि मनुष्यामध्यें जातिभेदाचें एकहि विशेष चिन्ह पाहण्यांत येत नाहीं. जातिभेद जर असता तर मनुष्यांच्या आकृति भिन्न असत्या यांत कांहींएक संदेह नाहीं. पाहा: पशुपक्ष्यांमध्यें जातिभेद आहेत; कारण त्यांच्या आकृति भिन्न भिन्न आहेत. जसें सिंह, व्याघ्र, अश्व, हत्ती, हंस, बगळा, कावळा, सारस, मयूर इत्यादि. याप्र-माणेंच जेथें जातिभेद आहे तेथें आकृतीचा भेद आहे. परंतु मनुष्यांमध्यें तसा जातिभेद नाहीं; कारण त्यांच्या अकृतींमध्यें भिन्नता नाहीं. सारांश, मनुष्यांमध्यें जातिभेद नाहीं. जे जातिभेद बाळगतात ते ईश्वरा-च्या मंगलाभिप्रायाविरुद्ध आचरण करितात. परमे-श्वर सर्व मनुष्यांचा पिता असल्यामुळें मनूष्यमात्राचें पर-स्परांशीं भाऊबहिणींचें नातें आहे.